www.rajdand.com
सातारा/पुणे, शनिवार
20.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । पौष कृ.२९
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# देशातील सर्वात मोठ्या गृहप्रकल्पाचं लोकार्पण

## भाषण करताना मोदी भावुक, डोळे पाणावले, कंठ दाटला

**सोलापूर:** देशातील सर्वात मोठ्या गृहप्रकल्पाचं लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते करण्यात आलं. सोलापुरातील रे नगरमध्ये तब्बल ३५० एकरवर ८०० पेक्षा अधिक इमारती उभारण्यात आल्या आहेत. यात एकूण ३० हजार फ्लॅट्स असतील. पैकी १५ हजार फ्लॅट्सचं काम पूर्ण झालं आहे. त्यांचं लोकार्पण मोदींच्या हस्ते आज झालं. यावेळी भाषण करताना मोदींचे डोळे पाणावले, त्यांचा कंठ दाटून आला.



सोलापूरमधील हजारो गरिबांसाठी, हजारो मजुरांसाठी आम्ही एक संकल्प केला होता. तो आज पूर्ण होतोय याचा आनंद वाटतो. पीएम आवास योजनेच्या अंतर्गत देशातील सर्वात मोठ्या सोसायटीचं लोकार्पण झालं आहे. मी ही सोसायटी पाहून आलो आणि मनात विचार आला मलाही लहानपणी अशा घरांमध्ये राहण्याची संधी मिळाली असती तर..., असं म्हणतेवेळी पंतप्रधान काही क्षण थांबले.

पंतप्रधान मोदींनी त्यांचं भाषण थांबवलं. समोर ठेवलेल्या ग्लासातील पाणी प्यायले. त्यांचा कंठ दाटून आला होता. डोळे भरुन आले होते. मोदींनी भावनांना आवर घालत भाषण पुढे सुरू ठेवलं. 'या वास्तू पाहिल्यावर मनाला समाधान वाटतं. हजारो कुटुंबांची स्वप्नं साकार होतात तेव्हा त्यांचे आशीर्वाद मिळतात. हीच माझी कमाई आहे. जेव्हा मी या प्रकल्पाचं भूमिपूजन केलं होतं, तेव्हा मी तुम्हाला शब्द दिला होता. या प्रकल्पाचं लोकार्पण करायलाही मीच येईन, असं वचन मी तुम्हाला दिलं होतं,' याची आठवण मोदींनी करुन दिली.

दोन प्रकारचे विचार असतात. एक म्हणजे लोकांना भडकावण्याचा. दुसरा श्रमिकांचा सन्मान करण्याचा. आम्ही दुसऱ्या विचारानं पुढे चालतो. श्रमिकांचा सन्मान, गरिबांचं कल्याण हाच आमचा विचार आहे, असं म्हणताना मोदींनी काँग्रेस सरकारवर निशाणा साधला. 'आपल्या देशात कित्येक वर्षे गरिबी हटावची घोषणा दिली गेली. पण गरिबी हटली का? गरिबांच्या नावे योजना तयार केल्या जायच्या. पण त्यांचा लाभ गरिबांना मिळायचाच नाही. त्यांच्या हक्काचा पैसा मध्यस्थच खायचे,' अशा शब्दांत मोदींनी मागच्या सरकारांवर टीका केली.

# मधुर हास्य! कपाळावर टिळा, कोदंडधारी राम मूर्तीचे प्रसन्न भाव



**आयोध्या :** देशभरातील नागरिकांना प्रतीक्षा असलेल्या अयोध्येतील राम मंदिराचं उद्घाटन येत्या २२ जानेवारी रोजी केलं जाणार आहे. या दिवशी मंदिरात रामलल्लांच्या मूतीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ही प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. श्री राम जन्मभूमी ट्रस्टने देशभरातील अनेग दिग्गजांना, मोठ्या नेत्यांना, कलाकार, खेळाडू आणि साधू-संतांना या सोहळ्याचं निमंत्रण पाठवलं आहे. हजारोंच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडेल.

दरम्यान, १८ जानेवारी रोजी मंदिराच्या गाभाऱ्यात श्रीरामाची मूती ठेवण्यात आली. या मंदिरातला मूर्तीचा पहिला फोटो आता समोर आला आहे. ही मूती मंदिरात आणताना एका वस्त्रात गुंडाळली होती. तसेच मूतीच्या डोळ्यांवर पट्टी बांधण्यात आली होती. आत ती पट्टी काढण्यात आली आहे. त्यामुळे श्रीरामाचं दर्शन झालं आहे. मंदिरात रामलल्ला म्हणजेच बाळ रुपातील रामाची मूती असणार आहे. तसेच शिल्पकार अरुण योगीराज यांनी शाळीग्राम दगडापासून घडवलेली रामाची मूतीही असणार आहे. अरुण योगीराज यांनी घडवलेली मूती गाभाऱ्यात ठेवण्यात आली आहे. याच मूतीचा फोटो समोर आला आहे. सोशल मीडियावर या फोटोची चर्चा होतेय.

रामाची ही मूती खूप आकर्षक आहे. मधुर हास्य, कपाळावर टिळा, हातात सोन्याचा धनुष्यबाण असलेल्या रामाचं लोभस रूप या मूतीत पाहायला मिळालं आहे. मूतीचा हा फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या उभारणीच्या कामात गुंतलेल्या सर्व कामगारांनी गाभाऱ्यात मूती ठेवल्यानंतर हात जोडून प्राथर्नादेखील केली. तसेच रामनामाचा जप केला.

अरूण योगीराज यांनी साकारली श्रीरामाची मूती

कर्नाटकातील प्रसिद्ध शिल्पकार अरुण योगीराज यांनी कृष्णशिला येथे ही मूती तयार केली आहे. मैसूरच्या प्रसिद्ध शिल्पकारांच्या पाच पिढ्यांची कौटुंबिक पाश्वर्भूमी असलेले अरुण योगीराज सध्या देशातील सर्वात प्रसिद्ध शिल्पकार आहेत. अरुण योगीराज यांनी यापूवी अनेक रेखीव मूर्ती आणि शिल्पं साकारली आहेत. अरुण यांच्या कामाचं कौतुक खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही केलेलं आहे. अरुण यांचे वडील योगीराज हे देखील कुशल शिल्पकार. तर, त्यांचे आजोबा बसवण्णा शिल्पी यांना मैसूरच्या राजानं संरक्षण दिलं होतं.

**कशी आहे श्रीरामाची मूर्ती?**

गाभाऱ्यात ज्या मूतीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे ती सावळ्या रंगाची आहे आणि ही मूती म्हणजे रामाचं बालरुप आहे. ५ वर्षांच्या रामाची ही मूती आहे जी गाभाऱ्यात बसवली जाईल आणि त्या मूतीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा २२ जानेवारीला पार पडणार आहे. शिल्पकार अरुण योगीराज यांनी घडवलेली ही रामाची मूती ५१ इंच उच आहे. या मूतीचं वजन २०० किलो आहे. गाभाऱ्यात ही मूती ठेवली जाणार आहे आणि २२ जानेवारी या दिवशी दुपारी १२.२० वाजता प्राणप्रतिष्ठा सोहळा सुरु होईल जो दुपारी १ वाजपेर्यंत चालेल.



छत्रपती शिवाजी महाराज गावठाण रोकडोबा मंदिर ग्रामदैवत या मंदिरामध्ये स्वच्छता अभियानासाठी भाजप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे साहेब रोकडोबा मंदिराला भेट दिली यावेळी तानाजी शिरोळे रोकडोबा मंदिर विश्वस्त यांनी शाल श्रीफळ व रोकडोबा महाराजांचा फोटो देऊन रोकडोबा मंदिर ग्रामदैवत व समस्त ग्रामस्थ मंडळींच्या वतीने सत्कार करण्यात आला याप्रसंगी आमदार सिद्धार्थ शिरोळे माजी महापौर मुरलीधर मोहोळ मा.नगरसेवक आदित्य माळवे भाजप नेते सुनिल देवधर साहेब दत्तात्रय खाडे सतीश चव्हाण राहुल शिरोळे विजय बहीरट बाबा शिरोळे गिरीश बहिरट शैलेश बडदे राहुल दुर्गे अर्जुन पालकर दिनकर घारे अजय शिंदे अनिल बहीरट उमेश गोरे शेलारमामा अशोक लोखंडे जोशनाताई एकबोटे स्वाती लोखंडे मुरलीधर मुसळे गणेश बागडे अपूर्व खाडे निलेश रेणुसे इतर मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते

# लोककल्याणासाठी दान देण्याचे ही धाडस लागते - हभप किरण महाराज जाधव

## लोककल्याण प्रतिष्ठान तर्फे अन्नपुर्ण योजना सुभारंभ व.साधना गौरव पुरस्कार सोहळा

**हडपसर :** लोककल्याणासाठी , समाजासाठी जे दान देण्याचे धाडस लागते ते फार क्वचित लोकात असते. समाजाला ज्याची गरज आहे ते ओळखुन ते देणं हे राजाभाऊ होले व त्यांचे प्रतिष्ठाण करीत आहे.असे मत तुकाई दर्शन फुरसुंगी येथे लोककल्याण प्रतिष्ठाण तर्फे राजाभाऊ होले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन लोककल्याण अन्नपुर्णा योजना शुभारंभ व लोककल्याण साधना गौरव पुरस्कार वितरण प्रसंगी कैकाडी महाराजांचे तीसरे वंशज हभप किरण महाराज जाधव बोलत होते.यावेळी व्यासपिठावर मा.प.स.सदस्य शंकर हरपळे,माजी नगरसेवक मारुती तुपे,लोककल्याण प्रतिष्ठाणचे अध्यक्ष राजाभाऊ होले,कार्याध्यक्ष हरीश्चंद्र कुलकणी,उपाध्यक्ष दिलीप भामे,प्रा.एस.टी.पवार, संजय देशमुख, पांडुरंग शेंडे, सुहास खुटवड, दत्तात्रय राऊत, शिवसेना प्रवक्त्या विद्या होडे,छाया दरगुडे आदी उपस्थित होते.



लोककल्याण अन्नपुर्णा योजनेच्या १७ व्या लाभार्थी श्रीमती राणी मुदकवी यांना त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होईपर्यंत दरमहा पुरेल इतका किराणा वाटप शुभारंभ करण्यात आला तर विविध क्षेत्रात कार्यरत असणा-या नवरत्न साधना गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नवरत्न साधना-पो.नि.उल्हास कदम,समाज-रमेश निवंगुणे,उद्योग-विशाल कामठे,ज्ञान-तुकाराम ससाणे,धर्म-निखील दरेकर,क्रिडा-जितेंद्र साळुंखे,सहकार-भारत बिडवे,पत्रकारिता-दिगंबर माने,मातृ-पितृ गौरव-श्री व सौ.जया लक्ष्मण कोल्हे यांना किरण महाराज जाधव यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.पुरस्काराचे हे १४ वे वर्ष होते.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना समाजा समोर आणुन त्यांना त्यांच्या क्षेत्रात अधिक कार्य करण्याची उर्जा मिळावी.तसेच विधवा महिलेला काडीचा आधार देण्याचा आमचा प्रयत्न असतो असे लोककल्याण प्रतिष्ठाणचे अध्यक्ष राजाभाऊ होले यावेळी म्हणाले.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना मा.प.स.सदस्य शंकर हरपळे म्हणाले,समाजात काही लोकांकडे पैसा भरपुर आहे पण दानत नाही. सत्कार्य कसे करावे हे राजाभाऊ होले व त्यांच्या प्रतिष्ठान कडुन शिकण्यासारखे,गिरवण्यासारखे आहे.याप्रसंगी शिवसेना प्रवक्त्या विद्या होडे,मा.नगरसेवक मारुती तुपे यांनी ही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वर्षा शेंडे,प्रास्ताविक दिलीप भामे,मानपत्र वाचन प्रा.एस.टी.पवार तर आभार हरीश्चंद्र कुलकणी यांनी मानले.

# जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलन दौऱ्यात बारामतीतून दीड हजार चार चाकी वाहने जाणार

## बारामती मराठा क्रांती मोर्चाची जय्यत तयारी

**बारामती:** आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने दि २६ जानेवारी २०२४ रोजी मुंबईतील आझाद मैदान या ठिकाणी करण्यात येणाऱ्या आमरण उपोषणासाठी सुरू असलेल्या सुरू होणाऱ्या मुंबई दौऱ्यामध्ये बारामती शहर व तालुक्यातील तब्बल एक ते दीड हजार चार चाकी वाहनांसह सकल मराठा समाज मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती सकल मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत ॲड. विजय तावरे व मराठा क्रांती मोर्चाचे अध्यक्ष अमरजीत जगताप म्हणाले,दि. २६ जानेवारी २०२४ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणी साठी आमरण उपोषण करणार आहेत. मनोज जरांगे पाटील करीत असलेल्या आमरण उपोषणासाठी त्यांना साथ देण्यासाठी बारामती तालुक्यातील प्रत्येक गावातून वाडी वस्तीवरून दहा ते बारा चार चाकी वाहने व सामानासाठी एक ट्रॅक्टर किंवा एक टेम्पो अशी प्रत्येक गावाची एक तयारी केली जाणार आहे. बारामती तालुक्यातून एकूण एक ते दीड हजार चार चाकी वाहने व सामानाचे टेम्पो दि. २४ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ७ वा. शिवाजी उद्यान, कसबा, बारामती येथून श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोरगावच्या दिशेने निघतील. मोरगाव मध्ये मोरगावसह आजूबाजूच्या गावातील समाजबांधव सकाळी ८ वा. एकत्र जमतील व त्यांचेसह संपूर्ण बारामती तालुक्यातील समाज बांधव पुण्याकडे कूच करत देहूरोड येथे पोहोचणार आहेत. आंदोलनासाठी येणाऱ्या बारामती तालुक्यातील सर्व समाज बांधवांच्या जेवणाची सर्व व्यवस्था ही मराठा क्रांती मोर्चा, बारामती यांच्या वतीने करण्यात येणार आहे. त्यासोबत आंदोलनासाठी जाणाऱ्या समाज बांधवांसाठी वैद्यकीय प्रथमोपचार साहित्य सोबत घेण्यात येणार आहे. आंदोलन हे मनोज जरांगे पाटील यांचे सूचनेप्रमाणे होणार असून ते शांततेच्या मार्गानेच होणार आहे. बारामती तालुक्यातील जे समाज बांधव आंदोलनासाठी येणार आहेत ते सर्वजण जरांगे पाटलांच्या आदेशाशिवाय आंदोलन ठिकाणापासून परत येणार नाहीत. आंदोलनाला निघाल्यापासून परत येईपर्यंत कोणीही कोणत्याही अफवांना बळी पडू नये, जो पर्यंत मनोज जरांगे पाटील स्वतः एखादी गोष्ट स्वतःच्या तोंडाने सांगत नाहीत. तोपर्यंत कोणीही कुठल्याही निष्कर्षाला येवू नये, असे आवाहन मराठा क्रांती मोर्चा, बारामती यांच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी सुनिल सस्ते, प्रताप पागळे, भारत जाधव,कुणाल काळे, शशांक पवार, संभाजी माने, गणेश कदम,संदीप मोहिते, विनोद जगताप, अरविंद सावंत, रोहन ढवाण, सागर खलाटे, हेमंत नवसारे, विकास खोत, योगेश सस्ते, पृथ्वीराज चव्हाण, महेंद्र निगडे, जयेश साळुंके आदी उपस्थित होते.




# मनपा कंत्राटी कामगारांच्या नाम फलकाचे उद्घाटन



पुणे महानगरपालिकेतील येरवडा विभागातील राष्ट्रीय मजदूर संघाच्या सभासद असणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या नामपालकाचे उद्घाटन कामगार नेते व राष्ट्रीय मतदार संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे आयोजन संघटनेचे कंत्राटी सफाई कामगार संघटक शरद भाकरे यांनी केले यावेळी बोलताना कामगार नेते सुनील शिंदे म्हणाले कंत्राटी कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत हे प्रश्न सोडवण्यासाठी महापालिकेतील अधिकारी उदासीन असून संघर्ष करूनच कंत्राटी कामगारांना हे प्रश्न सोडवावे लागतील त्यासाठी सर्व कंत्राटी कामगारांची एकजूट ही अत्यंत महत्त्वाची आहे संघटनेचे उपाध्यक्ष सिताराम चव्हाण सेक्रेटरी एस के पळसे विजय पांडव बाबा कांबळे रवींद्र आगम जानवी दिघे धुळेकर ताई उज्वल साने मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगार उपस्थित होते

# राजकारणाचा न्याय!

**राजेंद्रकुमार शेळके**

पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला न भूतो न भविष्यति बहुमत मिळाले. मनात भय उत्पन्न व्हावे, असे ते बहुमत होते. ते सुरक्षित ठेवण्यासाठी राजीव गांधी सत्तेत आल्यानंतर महिन्याभरात पक्षांतरबंदी कायदा झाला. १५ फेब्रुवारी १९८५ रोजी राष्ट्रपतींनी मान्यतेची मोहोर उमटविली. राज्यघटनेच्या दहाव्या सूचीत या कायद्याचा समावेश झाला. हा कायदा झाल्यापासून चार दशकांमध्ये पक्षांतरे थांबलेली नाहीत. सरकारे पडणे संपले नाही. सभागृहांमधील गटोपगटांची निमितीही गोठली नाही. थोडक्यात, या कायद्याचे राजकीय संस्कृती निवळशंख करण्याचे उद्दिष्ट बिलकुल साधलेले नाही. उलट, या कायद्यातील पळवाटा, चोरवाटा शोधण्याची अहमहमिका सुरू झाली. कज्जेदलालीने कळस गाठला. हे सारे लोकांचे राजकारण नसून कुरघोडीचे कायदेकारण असते. महाराष्ट्रात तेच चालू आहे.

कुठेही जनतेचे न्यायालय असे फलक लावून निकालांचा आपल्याला हवा तो अर्थ श्रोत्यांना सांगता येतो. मात्र, मतपेटी हेच जनतेचे एकमेव न्यायालय असते. विधानसभेच्या अध्यक्षांच्या निकालांना आव्हान देण्याची जागा न्यायालय ही असते. शिवसेनेने तसे ते सर्वोच्च न्यायालयात दिले आहे. दुसरीकडे, ठाकरे गटाच्या आमदारांना अध्यक्षांनी अपात्र का ठरविले नाही, अशी तक्रार करणारी याचिका शिंदे गटाने उच्च न्यायालयात केली आहे. असे असताना एका बाजूने व्यासपीठावर वकिलांना आणून विधानसभा अध्यक्षांच्या निकालाची चिरफाड करणे आणि दुसरीकडे, अध्यक्षांनी लगोलग आपल्या निकालाचे समर्थन करून, त्याची घटनात्मक वैधता अधोरेखित करणे, या दोन्ही बाबी न्यायासनासमोरील सुनावणी खेचून बाहेर जनतेत आणणे आहे. न्यायालयीन प्रक्रियेचे पावित्र्य आणि गांभीर्य उणावणारा हा घटनाक्रम आहे.

शिवसेनेची रीतसर घटना होती का, तिच्यात सुधारणा कधी झाली, निवडणूक आयोगाला सादर केलेल्या पत्रामध्ये घटनादुरुस्तीचा उल्लेख होता का, पक्षात रीतसर पक्षांतर्गत निवडणूक झाली का, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधीन राहून अध्यक्षांनी काम केले का, शिवसेनेची २०१२ मधील घटनादुरुस्ती वैध की अवैध, यातील काही प्रश्नांची तीन व्यासपीठांवर छाननी झाली किंवा पुढेही होईल. पहिले व्यासपीठ विधानसभा अध्यक्षांचे. दुसरे निवडणूक आयोगाचे आणि तिसरे न्यायालयाचे. एकाच घटनेचा तीन ठिकाणी लागणारा अन्वय सारखा नसणारच. त्यामुळे, उद्धव ठाकरे यांच्या महा-पत्रकार परिषदेनंतर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेले उत्तरही अनेक प्रश्न उपस्थित करणारे होते. पक्षांतरबंदी आणि त्यातून जन्माला येणारे विवाद सभागृहांच्या अध्यक्षांकडे निकालासाठी जावेत का, हा मूळ प्रश्न फार नाजूक आहे. हे सगळे अधिकार उद्या केवळ न्यायालयांकडे गेले तर संसदीय लोकशाहीतील अध्यक्षांच्या न्यायिक स्थानाला धक्का लागेल. तसे होणे उचित नाही. दुसरीकडे, कोणत्या सभागृहांचे अध्यक्ष हे पक्षपाती वागतात आणि कोणते अध्यक्ष निष्पक्ष निकाल देतात, हे ठरविण्याचा अधिकार कोणाचा? एखाद्या कज्जेदलालीत राजकीय पक्षच पक्षकार असेल तर त्याला असा ठपका ठेवण्याचा नैतिक अधिकार नाही. तो जास्तीत जास्त उपलब्ध कायदेशीर पर्याय वापरून वरच्या न्यायासनाकडे दाद मागू शकतो. शिवसेनेचे दोन्ही गट न्यायालयात गेले आहेत, हे त्या दृष्टीने योग्य झाले.

लोकसभेची निवडणूक जवळ येते आहे. नंतर विधानसभेची निवडणूक येईल. दरम्यान उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमधील याचिकांची सुनावणी वेगवेगळी होणार की सर्वोच्च न्यायालय शिंदे गटाची याचिका मुंबईतून वर्ग करून एकत्रित सुनावणी करणार, हा प्रश्न आहे. ती सुनावणी किती वेळेत संपून निकाल कधी लागणार आणि त्या निकालाची तामिली सध्याच्या सभागृहाची मुदत संपण्याच्या आत होणार की नाही, हे सारे प्रश्न अनुत्तरित आहेत. महाराष्ट्रातील प्रत्यक्ष सत्तेच्या राजकारणावर तीनही व्यासपीठांवर झालेल्या किंवा होणाऱ्या न्यायप्रक्रियेचा थेट परिणाम होतो आहे का, हा यातला कळीचा प्रश्न आहे. तसा तो होत नसेल तर या साऱ्या प्रक्रियेतील प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने असणारी व्यर्थता नजरेआड करण्याजोगी नाही. आधी भाजपशी असणारी निवडणूकपूर्व युती तोडून उद्धव ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत गेले. मग एकनाथ शिंदे यांनी बंड करून ते सरकार पाडले. पुढे अजित पवार यांनीही जुना फसलेला राजकीय खेळ दुसऱ्यांदा यशस्वी करून दाखविला. हे सारे एकाच विधानसभेच्या कार्यकाळात घडले. असे शरद पवारांचे १९७८ चे खंजीरकांड वगळता इतक्या घाऊक प्रमाणात कधी झाले नव्हते. या साऱ्या ट्रॅपिझच्या थरारक खेळाचा खरा न्यायमूती शेवटी मतदार आहे. पक्षांतरबंदी कायदा आणि त्यातले असंख्य बदल यांचे जे मोठे अवडंबर उभे राहिले आहे, ते किती निरर्थक आहे, हे सगळे पक्ष रोजच्या रोज दाखवून देत आहेत. व्यवहारवादी राजकारणाला (रिअलपोलिटिक) नैतिक किंवा न्यायिक वेसण घालण्याला किती मर्यादा असतात, हे शिकविण्यासाठी महाराष्ट्राचे हे उदाहरण पुढे अनेक पिढ्या उपयोगी पडेल!

# म्हणावी तशी थंडी नाही

यंदा म्हणावी तशी थंडी नाही, असे म्हणताना किमान थंडी जाणवू लागली आहे, याविषयी समाधान मानावे, अशी जागतिक हवामानाची स्थिती आहे. पंजाब, हरियाणातील वेगाने वाहणारे वारे वक्राकार होत महाराष्ट्रात शिरले, तरच महाराष्ट्रातील तापमानात लक्षणीय घट संभवते. अन्यथा महाराष्ट्रात थंडीच्या कडाक्याऐवजी साधारण थंडी जाणवेल.

दक्षिण भारतातील केरळ, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तसेच पुदुच्चेरी, काराईकलमध्ये जवळपास गेले ७५ ते ८० दिवस सुरू असलेल्या ईशान्य मान्सूनचा जोर संक्रांतीदरम्यान ओसरला. तेथील हिवाळी पावसाचा हंगाम या वर्षी १४ जानेवारीला आटोपला आहे. तसा हा मान्सून डिसेंबरमध्येच निघून जावयास हवा. पण या वर्षी उशीर होत आहे. तेथील मान्सून बाहेर पडला रे पडला, की महाराष्ट्रातही थंडीसाठी पूरक वातावरण निर्माण होते. १४ जानेवारीला, ईशान्य मान्सूनच्या निर्गमनातून, विषुववृत्त समांतर पूर्वेकडून येणाऱ्या हंगामी पुरवी वाराझोताचा प्रभावही त्यामुळे कमी होईल. आणि विषुववृत्तादरम्यान पूर्व-पश्चिम हवेचा कमी दाब असलेले ह्यआंतरकटिबंधीय अभिसरणीय परिक्षेत (इंटर ट्रॉपिकल कॉनव्हर्जिग झोन) विषुववृत्तावरील (शून्य डिग्री अक्षवृत्त) त्याच्या सरासरी जागेपासून काहीसे दक्षिणेकडे म्हणजे १० अंश दक्षिण अक्षवृत्तापर्यंत (दक्षिण गोलार्धात) सरकेल. त्यामुळे महाराष्ट्रातही हवेच्या उच्च दाबाच्या टेकड्यांना छेदून जाणारी काल्पनिक उंचावरील रेषा म्हणजे पोळही (रिज) दक्षिण भारताकडे सरकेल.

काश्मीरमध्ये ह्यचालाई कलानह्ल बफर्वृष्टीविना

सरकलेल्या ह्यपोळह्लमुळेच उत्तरेकडून महाराष्ट्रात घुसणाऱ्या थंड वाऱ्यांसाठी हवेच्या उच्च दाबरूपी काल्पनिक भिंतीचा अडथळा दूर होऊन महाराष्ट्रात काहीशी थंडी वाढत आहे. येथे ह्यकाहीशी थंडीह्ल असा उल्लेख केला, कारण सध्या अस्तित्त्वात असलेल्या ह्यएल-निनोह्लच्या प्रभावामुळे, एकापाठोपाठ वाहणारे झंझावात हे कमी तीव्रतेनेच वाहत आहेत. त्यांचा कमकुवतपणा, तसेच दक्षिण अक्षवृत्ताकडे म्हणजे देशात जम्मू, काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडमध्ये शिरणाऱ्या ह्यसैबेरिअन अतिथंड हवेच्या लोटाअभावी काश्मीरमध्ये सध्या सुरू असलेला ४० दिवसांचा (२१ डिसेंबर ते ३१ जानेवारी) चालाई कलानचा उच्च थंडी व बर्फ पडण्याचा हंगामी कालावधीही



बफर्वृष्टीविना कोरडा जाताना दिसत आहे. एकूणच उत्तर भारततही सध्या थंडीची तीव्रता कमीच आहे. म्हणूनच महाराष्ट्रातही कडाक्याच्या ऐवजी साधारण थंडी जाणवेल, असा अंदाज आहे.

निसर्ग कालक्रमणाप्रमाणे २२ डिसेंबर या दिवशी पृथ्वीच्या दक्षिण टोकाकडील साडेतेवीस दक्षिण अक्षवृत्ताचा म्हणजे पृथ्वीचा मकरवृत्ताचा जास्तीत जास्त भाग हा सूर्यासमोर असतो आणि दक्षिण गोलार्धातील टोकाकडचा हा भाग १५ जानेवारीपर्यंतच्या (२२ डिसेंबर ते १५ जानेवारी) २५ दिवसांच्या संक्रमण कालावधीत मकरवृत्तावरच म्हणजे साडेतेवीस दक्षिण अक्षवृत्तावरच जाणवतो. या महिनाभराच्या कालावधीला झुंझुरमास, धनुर्मास, धुंधुर्मास किंवा शून्यमासही म्हणतात. म्हणूनच थंडीसाठी पोषक अशा शाकाहारी खाद्याचा आहारात समावेश करून वेगळ्या पद्धतीने हा कालावधी साजरा केला जातो. सूर्याचा धनू राशीत प्रवेश होतो म्हणून ह्यझुंझुरमासाह्लबरोबर धनुर्मासही म्हणतात. मात्र संक्रांतीच्या दिवशी सूर्याचा मकर राशीत प्रवेश होतो. म्हणून या दिवसाला मकर संक्रांत म्हणून संबोधले जाते.

भौगोलिक रचनेमुळे पंजाब, हरियाणा या राज्यांतील रहिवासी तेथील अतिथंड हवामानाला व एकंदरीत जनजीवनाला कंटाळलेले असतात. तिथे संक्रांतीदरम्यान शेकोटी किंवा आगटी लावतात, तिला तेथील स्थानिक ह्यलोहोरीह्ल म्हणतात. या लोहोरीभोवती सारे एकत्र येतात. थंडीचा त्रास टाळून तिचा उपभोग घ्यावा, हा यामागचा उद्देश असतो. अशा थंडीला सुरुवात होते म्हणून लोहोरी साजरी करतात. महाराष्ट्रात शेतकऱ्यांची शेतात साजरी होणारी येळ (वेळ) अमावस्या याच कालावधीत येते. शास्त्रीयदृष्ट्या या कालावधीतील सकाळच्या वेळेस हवेत प्राणवायूचे प्रमाण अधिक असते. ओझोनचा थर उत्तम असतो. म्हणून तर आहारविहार जाणीवपूर्वक केला जातो. त्या दिवसानंतर म्हणजे मकरसंक्रांतीनंतर पृथ्वीचा कल हळूहळू विषुववृत्ताकडे वाढून आणि तो ओलांडून पुन्हा उत्तर गोलार्धातील भाग सूर्यासमोर अधिक येणे (उत्तरायण) वाढत जाते.

आता या नेहमीच्या कालचक्रानुसार वर स्पष्ट केल्याप्रमाणे, निसर्गनिर्मित घडामोडींबरोबरच, उत्तर ध्रुवावरील बर्फाळ, आर्क्टिक, अतिथंड हवेचे उच्च दाब अक्षवृत्त वर्तुळीय पट्टाही त्यामुळे दक्षिणेकडे म्हणजे रशियन अक्षवृत्ताकडे सरकतो. त्यामुळे थंड हवा ही भारताकडे लोटली जाते. परिणामी आपल्याकडे जम्मू, काश्मीरमध्ये हवामान अतिथंड होते. त्या भागात बफर्वृष्टी होते. पश्चिम झंझावाताबरोबरच या ह्यसैबेरिअन चिलह्लचे स्थलांतर हे उत्तरेकडे थंडी वाढण्याचे एक प्रमुख कारण असते. म्हणून तर पंजाब, हरियाणा आणि राजस्थानच्या काही भागांत सध्या सकाळच्या वेळी धुक्याची चादर, तर काही भागात अति नव्हे, पण थंडीची लाट जाणवत आहे.

सध्या या भागात पहाटेचे किमान तापमान २ ते ५ अंशांदरम्यान आहे. पहाटेचे हे किमान तापमान सरासरीपेक्षा १ ते ४ अंशांनी कमी झाले आहे. याच पंजाब, हरियाणा, राजस्थान भागात पश्चिम दिशेकडून पूर्वेकडे ताशी २५० ते २८० किमी वेगाने वाऱ्याचे झोत वाहत आहेत. त्यातील काही वारे वक्राकार होऊन महाराष्ट्रात शिरले, तर पुढील काही दिवसांत येथील तापमानातही लक्षणीय घट होईल, अशी अपेक्षा आहे.

एल-निनोचा विसर?

सकाळी, संध्याकाळी राज्य धुक्याच्या दाट चादरीत लपेटले जात आहे. त्यामुळे दृश्यमानता २५ ते ५० मीटरवर येऊन ठेपली आहे, तर पुढील पाच दिवसांत काही भागांत भू-स्फटीकरणाचीही शक्यता नाकारता येत नाही. प्रसारमाध्यमांद्वारे सध्या महाराष्ट्रातील थंडीबाबतचा ओरडा कानी येत आहे. सध्या थंडी जाणवते आहे असे जरी वाचनात किंवा कानावर येत असले, तरी सध्या पहाटेचे व दुपारचे, असे दोन्हीही किमान व कमाल तापमान हे अजूनही सरासरी तापमानाच्या पातळीत नसून, अधिकच आहे. खरे तर थंडी चाचपण्याच्या नादात आपणही चालू कालावधी हा एल-निनोचा आहे, हे विसरत आहोत. आणि म्हणून तर आपण सहज म्हणतो, ह्ययंदा म्हणावी तशी थंडी नाही! कशी असेल? जागतिक पातळीवरील सध्या सुरू असलेल्या वातावरणीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जशी थंडी असावी तशीच आहे. थंडीविषयी चर्चा होत आहे, हेच खूप आहे, हेही ध्यानात घ्यावे, असे वाटते.

त्यातही आता, उद्या आणि परवा म्हणजे बुधवार-गुरुवारी (१७-१८ जानेवारी) विदर्भातील गोंदिया आणि गडचिरोली या दोन जिल्ह्यांत पुन्हा काहीसे ढगाळ वातावरण असण्याची शक्यता निर्माण झाली आहे. म्हणून तेथील थंडी दोन दिवसांकरिता जाईल. संक्रांतीदरम्यानच्या या काळात थंडी जाणवत असली, तरी सध्या १७ ते २१ जानेवारीपर्यंतच्या पुढील पाच दिवसांत महाराष्ट्रात पहाटेचे किमान तापमान हे १२ अंश (सरासरीइतके तर काही भागात सरासरीपेक्षा एखाद्या अंशाने अधिक), तर दुपारचे कमाल तापमान २८-३० अंश (म्हणजे सरासरीपेक्षा एखाद्या अंशाने अधिक) दरम्यान असू शकते, असे वाटते.

महाराष्ट्रात रब्बी हंगामातील भरड धान्ये, शेतपिके ही या कालावधीत फलधारणेच्या म्हणजे दाणा भरण्याच्या अवस्थेत, तर काही हुरडा अवस्थेत असतात. या कालावधीत पिकांच्या मुळांना वाढीसाठी जमिनीखाली मोकळी हवा व जमिनीच्या वर निरभ्र आकाशातून प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेतून अन्नद्रव्य निमितीसाठी स्वच्छ सूर्यप्रकाश मिळणे गरजेचे असते. म्हणून इतर प्रणालीतून वातावरणीय अडथळयाविना नेहमी असतो तसा स्वच्छ थंडीचा काळ शेतीसाठी महत्त्वाचा मानला जातो.

**माणिकराव खुळे**
(निवृत्त शास्त्रज्ञ,
भारतीय हवामान विभाग)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पुन्हा एकदा बिबट्या जखमी

**नारायणगाव** : पुणे नाशिक महामार्गावर नारायणगाव ते कळंब गावाच्या दरम्यान गेली वर्षभरात अज्ञात वाहनाच्या धडकेमध्ये बिबट्या, तरस, कोल्हा, रानमांजर व इतर वन्य प्राणी अनेकदा जखमी तसेच ठार झाले आहेत.

अशाच प्रकारे गुरुवार दिनांक १८ रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास एक पूर्ण वाढ झालेला नर बिबट्या अज्ञात वाहनाच्या धडकेत कळंब गावच्या हद्दीत वरपे मळा येथे जखमी झाला. ही घटना घडताच स्थानिक नागरिकांनी तेथे धाव घेतली. परंतु जखमी बिबट्या जवळ जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या ग्रामस्थांवर तो बिबट्या धावत होता. त्यामुळे येथील नागरिकांनी वनविभाग व नारायणगाव पोलीस स्थानकास घटनेची माहिती दिली. वनक्षेत्रपाल स्मिता राजहंस, प्रदिप चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांच्या सूचनेनुसार वनपाल मडके, वनरक्षक तांदळे, जुन्नर चे वनपाल नितीन विधाटे, वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, पोलीस हवालदार संतोष कोकणे, मंगेश लोंढे, माशाळकर, कोतकर, पोलीस पाटील सुशांत भुजबळ इतर कमर्चारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. व जखमी बिबट्याला उपचारासाठी देण्यास मदत केली. या दरम्यान जखमी बिबट्या हा रस्त्याच्या मध्यभागी जखमी अवस्थेत असल्याचे पाहून रस्त्यावरून ये जा करणाऱ्या वाहनांनी व प्रवाशांनी तेथे मोठी गदी केली



होती. त्यामुळे सुमारे तीन तास वाहतुकीला अडथळा आला अखेर माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रातील एस ओ एस संस्थेचे डॉक्टर नचिकेत ढगे, पशू वैद्यकीय सहाय्यक महेंद्र ढोरे,आकाश डोळस, बाबू नेहरकर, व त्यांच्या टीमने जखमी बिबट्याला ट्रँक्यूलाइज बंदुकी ने बेशुद्ध केले व पिंजऱ्यात घालून त्याला माणिकडोह येथील बिबट्या निवारा केंद्रात पुढील उपचारासाठी नेले.

जखमी बिबट्याच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असून त्याच्या जबड्याला मार लागला आहे. तसेच त्याच्या शरीरात रक्तस्त्राव झाला असण्याची शक्यता पाहता त्याला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली ठेवले आहे. अशी माहिती तेथील डॉक्टरांनी दिली.

# बारामतीतील कृषी विज्ञान प्रदर्शनात महाराष्ट्रासह इतर राज्यातील शेतकऱ्यांची उपस्थिती

**बारामती** : ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्र बारामतीच्या फार्म वरती सुरू असलेल्या जागतिक दर्जाच्या कृषी प्रदर्शनामध्ये आज दुसऱ्या दिवशी विविध मान्यवरांनी भेट दिली. त्याचबरोबर राज्यभरातील सर्व जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह आज तेलंगणा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा, तामिळनाडू इ.राज्यातील शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला. आजच्या प्रमुख पाहुण्यांच्या भेटीमध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत कुमार पाटील तसेच राज्याचे फलोत्पादन संचालक कैलास मोते यांनी या प्रदर्शनास भेट दिली. हे प्रदर्शन आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, नाबार्ड तसेच काही खाजगी कंपन्या यांच्या सहकार्यातून होत आहे. या प्रदर्शनामध्ये १५० पेक्षा जास्त कंपन्यांचे स्टॉल आहेत. भाजीपाला पिकांबाबत असलेले नवीन तंत्रज्ञान त्याचबरोबर फुल शेतीमध्ये आलेले विविध नवीन वाण व लागवड पद्धती, त्याचे नियोजन याबाबतची माहिती घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल जाणवला. ऊस पिकांमधील असलेल्या विविध प्रजाती व त्याची लागवड पद्धती त्यासाठी वापरलेले ठिबकचे तंत्रज्ञान व खत पद्धती, चायनीज पद्धतीने केलेली मका लागवड, पांढरा झेंडू, भाजीपाल्याचे विविध प्रकार याची



माहिती शेतकरी उत्सुकतेने घेताना दिसले. कमी खर्चातील शेती मशागत औजारे, औषध फवारणी औजारे याची देखील माहिती शेतकरी घेत होते. या प्रदर्शनामध्ये शनिवार दि २० जानेवारी ते २१ जानेवारी दरम्यान डॉ. आप्पासाहेब पवार अश्वप्रदर्शन आयोजित केले आहे. यामध्ये मारवारी आणि भीमथडी देखणे दिमागदार उत्तम प्रतीचे अश्व प्रदर्शित करण्यात येणार आहेत. तसेच या ठिकाणी दररोज होलस्टेन फ्रिजियन गाईचे दूध उत्पादन स्पर्धा ही आयोजित केलेली आहे, यामध्ये शेतकरी आपल्या गायी सह सहभागी होत आहेत. या ठिकाणी कृषी विज्ञान केंद्राचे विविध उत्पादने, जीवाणू खते, बायोप्रोम व औषधे, फळ व भाजीपाला रोपे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्याचबरोबर सिद्ध वळूची वीर्य मात्रा आणि दर्जेदार गाभण कालवडी खरेदीसाठी संधी आहे. आजच्या प्रदर्शनात आलेल्या शेतकऱ्यांचे गदी पाहता उद्या आणि परवा ही या प्रदर्शनाचे नियोजन योग्य रीतीने व्हावे, यासाठी ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार व संस्थेचे मुख्य कायर्कारी अधिकारी प्रा निलेश नलावडे हे सर्वत्र स्वतः जातीने लक्ष देऊन काही त्रुटी राहू नये म्हणून योग्य सूचना देत आहेत. कोटः:: माझे हे पाचवे वर्ष पहाण्याचे आहे. सर्व नियोजन उत्तम झाले आहे. मला व्हाट्सअप वरती मेसेज आला होता. या ठिकाणी फुले आणि भाजीपाला पिकांमध्ये जे तंत्रज्ञान वापरले आहे ते मला अतिशय आवडले व ते मी माज़्या शेतात करणार आहे. पंडित थोरात, (खानापूर तालुका, जि. परभणी). कोटः: मी यापूवी दोन वेळा हे प्रदर्शन पाहण्यासाठी आलो होतो. यावषी मला मत्स्य शेतीची माहिती आवडली. सुभाष मोदगे, बेळगाव ता. जिल्हा बेळगाव.

# समाजात चांगले विचार रुजवण्याठी मराठी पत्रकारितेचे मोठे योगदान : प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे

**हडपसर** : समताधिष्ठीत समाज रचना हा सत्यशोधकीय पत्रकारितेचा उद्देश होता. समाजात आधुनिक चांगले विचार रुजवण्यासाठी मराठी पत्रकारितेचे फार मोठे योगदान आहे. प्रत्येक मराठी वृत्तपत्राची भाषाशैली वेगळी असते. एका वृत्तपत्रांत भाषेची अनेक वैशिष्ट्ये पाहायला मिळतात. अशा प्रकारचे लेखन विद्यार्थ्यांनी वाचून ती लेखनशैली आत्मसात करायला पाहिजे त्यातून रोजगाराची संधी उपलब्ध होईल. असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



पुणे, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिन व मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त सत्यशोधकीय पत्रकारिता या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पत्रकार अशोक बालगुडे, पत्रकार कृष्णकांत कोबल, पत्रकार दिगंबर माने, पत्रकार अनिल मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे होते. या प्रसंगी उपप्राचार्य अनिल जगताप, पत्रकार विवेकानंद काटमोरे, पत्रकार वसंत वाघमारे, पत्रकार रागिणी सोनवणे, पत्रकार अनिल दाहोत्रे उपस्थित होते.

पत्रकार अशोक बालगुडे यांनी वृत्तपत्रातील छापील मजकूरावर लोकांचा आजही विश्वास आहे. वृत्तपत्राचे वाचन केल्याने आपल्या ज्ञानात भर पडत असते. भोवतालच्या परिस्थितीविषयी आपल्याला माहिती मिळते असे सांगितले. पत्रकार अनिल मोरे यांनी विद्याथीदशेत आपण आपले ध्येय निश्चित करून ते प्राप्त करण्यासाठी भरपूर वाचन करा. शिक्षण हे आपल्या आयुष्याची गुरुकिल्ली असून आपण जास्तीत जास्त शिकले पाहिजे असे सांगितले. ह्लप्रसार माध्यमे हा लोकशाहीचा चौथा खांब आहे. सामाजिक बांधिलकी ठेऊन सामान्य माणसांच्या सार्वजनिक समस्या मांडण्याचे काम प्रसारमाध्यमे करत असतात. समाजाला दिशा देण्याचे काम वृत्तपत्र करतात. ₹ असे मत पत्रकार माने यांनी व्यक्त केले. पत्रकार कृष्णकांत कोबल यांनी ह्लसत्यशोधकीय पत्रकारिता ही स्वातंत्र्य, समता बंधुता मूल्यांना प्रमाण मानते. सत्यशोधन हे पत्रकारितेचे प्रमुख तत्व असते. वाचकांचा पत्रव्यवहार हा लेखन - वाचन समृद्ध करण्याची प्रक्रिया होती. त्यातून वाचकांची वैचारिक घडण होत असल्याचे सांगितले.

या प्रसंगी पत्रकार दिनानिमित्त स्थानिक पत्रकारांचे सत्कार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रवीण ससाणे, डॉ. वंदना सोनवले, प्रा. अनिता गाडेकर यांनी कार्यशाळेचे संयोजन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. डॉ. नाना झगडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संगीता देवकर यांनी केले तर आभार प्रा. नितीन लगड यांनी मानले.

दैनिक राजदंड

प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक नियुक्त करण्याबाबत TRAINEE REPORTERS, SUB-EDITORS
पाहिजेत

पत्रकारितेतील **मानदंड ठरणाऱ्या दै. राजदंडची (MARATHI) पुणे आवृत्ती आणि THEDEMOCRAT.LIVE (ENGLISH)** नुकतीच सुरू झाली आहे. शहर व जिल्ह्यातील राजकीय घडामोडी, सामाजिक समस्या, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उद्योग विश्वातील बदलाची माहिती वाचकांपर्यत पोहचविण्याचा या वृत्तपत्राचा मानस आहे. प्रिंट, ऑनलाईन, युट्यब या माध्यमात राजदंड मीडिया समूहाचे काम चालणार आहे.

पत्रकारितेत करिअर करू पाहणाऱ्या युवक-युवतीसाठी **दै. राजदंडचे** व्यासपीठ दिशादर्शक ठरणार आहे. नवोदित पत्रकारांना हा महत्वाचा प्लॅटफार्म आहे. प्रशिक्षणार्थी बातमीदार, उपसंपादक म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना **दै. राजदंडमध्ये** संधी उपलब्ध करून देत आहे. तरी याची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावी, ही विनंती.

**कल्पना सुर्वे,**
**संचालक,** (HR) दै. राजदंड, पुणे
email: rajdand.pune@gmail.com

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# आमदार अपात्रता निणर्यामुळे नार्वेकरांच्या विश्वासाहर्तेवर प्रश्नचिन्ह



**पुणे :** ज्यांच्यामुळे शिवसेनेतील दिग्गज नेते पक्ष सोडून गेले, त्यांनीच शिवसेनेविरोधात निकाल देऊन स्वतःचा राजकीय आत्मघात करून घेतल्याची खरमरीत टीका शिवसेनेच्या (उध्दव बाळासाहेब ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आज बालगंधर्व कलादालनात बोलताना केली.

बालगंधर्व कलादालनात आयोजित प्रसिध्द व्यंगचित्रकार अमित पापळ यांच्या ₹बाळकडू 2₹ या व्यंगचित्र प्रदर्शनाला आज सुषमा अंधारे यांनी भेट दिली, त्यावेळी त्या पत्रकारांशी बोलत होत्या. यावेळी प्रसिध्द व्यंगचित्रकार अमित पापळ आणि इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, काल झालेल्या महापत्रकार परिषदेत जनता अदालतीमध्ये झालेल्या सादरीकरणावरून संपूर्ण महाराष्ट्रासमोर नार्वेकर खोटे पडले आहेत, उघडे पडले आहेत. त्यांनी दिलेल्या निकालामुळे ते जनतेचा विश्वास गमावून बसले असून भारतीय जनता पक्षाने त्यांच्या राजकीय बळी घेतला आहे.

बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासासंबंधी बोलताना त्या म्हणाल्या की, मुख्य सचिव पुण्यात येऊन बालगंधर्व पाडण्यासंदर्भात वक्तव्य करतात, हे निषेधार्ह असून बालगंधर्व रंगमंदिर आजही सुस्थितीत असताना त्याचे पाडकाम करणे चुकीचे आणि गैर आहे. बालगंधर्व रंगमंदिरच्या पुनर्विकासासाठी होणाऱ्या पाडकामामुळे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार या सगळ्यांबरोबरच पडद्यामागील कलाकार आणि मदतनीस यांच्या देखील जीवन मरणाचा प्रश्न उभा राहणार आहे.

यावेळी व्यंगचित्र पाहून बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, राजकीय घडामोडींचे अचूक आणि सखोल ज्ञान असलेले अमित पापळ हे संवदेनशील व्यंगचित्रकार आहेत. त्यांच्या कुंचल्यातून येणाऱ्या फटकाऱ्यांना वेगळा अर्थ प्राप्त होतो. राजकीय घडामोडींवर ते मार्मिक आणि बेधडकपणे व्यक्त झाले आहेत. सर्व नागरिकांनी आवर्जून बघावे, असे हे व्यंगचित्र प्रदर्शन आहे.

# मराठा आरक्षण आंदोलनाला समाजवादी पक्षाचा पाठिंबा



**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी होणाऱ्या आंदोलनाला समाजवादी पक्षाचा पाठिंबा असून आंदोलनासाठी राजधानी मुंबईत येणारे मनोज जरांगे पाटील आणि अन्य आंदोलकांचे पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात येईल, असे प्रदेशाध्यक्ष अबू आजमी यांनी सांगितले.

आजमी यांनी जरांगे यांना पाठिंबा देणारे पत्र पाठविले आहे. मुस्लिम समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाजवादी पक्ष दीघर्काळ आंदोलन करीत आहे. न्यायालयाने आदेश देऊनही मुस्लिम समाजाला शैक्षणिक क्षेत्रात पाच टक्के आरक्षण अद्याप दिलेले नाही. त्यामुळे मराठा समाजाच्या भावना आपण समजू शकतो. आपल्या मागणीला पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.यापूवी अंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलकांवर झालेल्या गोळीबार आणि लाठी हल्ला प्रकरणी शासन, प्रशासनाचा निषेध करून समाजवादी पक्षाने मराठा आंदोलकांना पाठिंबा दिला आहे. या पुढील काळातही मराठा समाजाला पक्षाचा पाठिंबा असेल. प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपण स्वतः इच्छा असूनही जरांगे पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊ शकत नाही. मात्र, पक्षाचे प्रवक्ते व महासचिव रेवण भोसले, महासचिव अनिस अहमद व अब्दुल रौफ यांचे शिष्टमंडळ आपली भेट घेणार आहे, असेही आजमी यांनी पत्रात म्हटले आहे.

# इराणच्या हल्ल्याला पाकिस्तानकडून मिसाईल माझ्याद्वारे प्रत्युत्तर

## या पुढील काळात संयम बाळगण्याची 'पाक' तंबी



**नवी दिल्ली :** इराणने पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात केलेल्या सर्जिकल स्ट्राइकला प्रतिउत्तर म्हणून पाकिस्तानकडून इराणवर मिसाइलचा मारा करण्यात आला. आमच्या देशाचे सावभौमत्व धोक्यात आणणाऱ्या आक्रस्ताळ्या कारवायांच्या विरोधात उचललेले प्रभावी पाऊल, अशा शब्दात पाकिस्तानने आपल्या हल्ल्याचे वर्णन केले आहे.

गुरुवारी सकाळी पाकिस्तानी इराणवर केलेल्या हल्ल्यात तीन महिलांसह सात जणांचा मृत्यू झाला. यामध्ये तीन बालकांचाही समावेश आहे. या हल्ल्यानंतर इराणने संयम बाळगावा आणि विशिष्ट विकोपाला जाईल असे कोणतेही कृत्य करण्याचे धाडस करू नये, अशी तंबी ही पाकिस्तानने दिली आहे.

इराणने मंगळवारी पाकिस्तानातल्या बलुचिस्तान प्रांतात ड्रोन आणि मिसाईलद्वारे हल्ला केला होता. बलुचिस्तानात मुख्यालय असलेल्या दहशतवादी गटाने सीमा भागातील इराणी पोलीस ठाणे आणि सैनिकांवर केलेल्या हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला करण्यात आल्याचे स्पष्टीकरण इराणने दिले आहे. या हल्ल्यानंतर संतप्त झालेल्या पाकिस्तानने इराणमधून आपल्या राजदूतांना परत बोलावून घेतले आहे. या प्रकारामुळे पाकिस्तान आणि इराणी या देशातील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत.

# इंदापूर बाजार समितीमध्ये 'इंदापूर कृषी महोत्सव - सभापती

**इंदापूर :** इंदापूर बाजार समितीमध्ये दि.२४ ते २८ जानेवारी दरम्यान पाच दिवसांच्या 'इंदापूर कृषी महोत्सव-२०२४'चे आयोजन करण्यात आले आहे. कृषी प्रदशर्नाचे भूमिपुजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विलासराव माने, उपसभापती रोहित मोहोळकर, आ. यशवंतराव माने, माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांचे हस्ते बुधवारी (दि. १७) पार पडले.

या संदर्भात पत्रकारांशी बोलताना सभापती विलासराव माने म्हणाले की, प्रतिवर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षी ही इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दि.२४ ते २८ जानेवारी दरम्यान पाच दिवसांच्या 'इंदापूर कृषी महोत्सव-२०२४'चे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे हे सहावे वर्ष आहे. महोत्सवाच्या दरम्यान कृषी, पशु-पक्षी, जनावरे, मत्स्य प्रदर्शन व डॉग शो व आकषर्णाचा केंद्रबिंदू असणा-या पुणे जिल्हातील एकमेव घोडे बाजाराचे ही आयोजन केलेले आहे. सोनाई डेअरी, नेचर डेअरी व पुणे जिल्हा मध्यवती सहकारी बँक हे या महोत्सवाचे सहप्रायोजक आहेत.

महोत्सवानिमित्त होणाऱ्या कृषी प्रदशर्नात शेती उत्पादने, बी-बियाणे, शेती औजारे- साधने, ऑटो मोबाईल्स, आवश्यक गृहोपयोगी वस्तु, अनुषंगिक यांत्रिक कृषी अवजारे, साहित्य मांडण्यात येणार आहे.

प्रदशर्नात २५० स्टॉल,५० खाद्य स्टॉल उभारण्यात येणार आहेत.पशु-पक्षी, जनावरांचे प्रदर्शन होणार आहे,असे सभापती माने यांनी सांगितले. घोडे बाजार घोडे चाल (रवाल), नाचकाम स्पर्धा, स्मार्ट घोडे नर-मादी, नुकरा, मारवाड, काटेवाडी, सिद्धी हे घोडे बाजाराचे प्रमुख आकर्षण आहे. डॉग शो प्रदर्शन हे देखील प्रदशर्नाने खास आकर्षण आहे,असे ते म्हणाले.

शालेय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम व पुरुष-मुलांसाठी 'महाराष्ट्राची लोककला हा कार्यक्रम, मुली- महिलांसाठी मोनाली करंदीकर यांचा 'फुल टु धमाल' व 'खेळ पैठणीचा' हे कार्यक्रम, अबालवृध्दांसाठी मनोरंजनाचे खेळ तर खवय्यांसाठी 'खाऊगल्ली'चे नियोजन ही महोत्सवात केले जाणार आहे, असे सभापती माने यांनी सांगितले.

उपसभापती रोहीत मोहोळकर, माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे, संचालक आमदार यशवंत माने, दत्तात्रय फडतरे, मधुकर भरणे, संग्रामसिंह निंबाळकर, मनोहर ढुके, संदीप पाटील, रुपाली वाबळे, मंगल झगडे, आबा देवकाते, तुषार जाधव, संतोष गायकवाड, अनिल बागल, दशरथ पोळ, रोनक बोरा, सुभाष दिवसे व प्रभारी सचिव संतोष देवकर यावेळी उपस्थित होते.

१ कोटी रुपयांची ऑफर असणारा दोन टन वजनाचा गजेंद्र रेडा व ड्रोन यंत्र सामुग्री स्टॉल हे या महोत्सवाचे गदी खेचणारे आकर्षण आहे.

महोत्सवाच्या काळात सकाळी दहा ते रात्री नऊ दरम्यान प्रशासकीय भवनापासून विद्याथी व नागरिकांसाठी मोफत बससेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यंदाच्या वर्षापासून अश्वरोहणातील ऑलिंपिक क्रीडाप्रकार प्रात्यक्षिके,महाराष्ट्र लोककला, बुलेट रायडींग विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

कृषी प्रदशर्नात नामांकित कंपनीचे शेती साधने, उत्पादने आदि शेती अनुषंगिक स्टॉल उभारणी, युटिलिटी इन्हेंट रणजीत पांडे करणार आहेत. स्टॉल नोंदणीसाठी शंकर शिंदे (९०९६३५५५४१ / ७५६४९०९०९१) यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यायात आले आहे.

# बारामती बस स्थानकाच्या जागेवर मूळ मालकांचा दावा

## वंचित बहुजन युवा आघाडीचे बेमुदत चक्री धरणे आंदोलन




**बारामती :** शहरातील बारामती बस स्थानकाचे काम जवळपास पूर्णत्वास आले असताना बस स्थानकाच्या जागेवर आमचा मालकी हक्क अद्याप कायम असल्याचा दावा करत या जागेचे हस्तांतरण झाले नसल्याचे स्पष्ट करत मूळ जागा मालकांनी वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून या बस स्थानकाच्या समोर गेली ११ दिवसांपासून बेमुदत चक्री उपोषण सुरू केले आहे.

वंचित बहुजन आघाडी पुर्व विभाग युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष मंगलदास निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली हे उपोषण सुरू आहे.

यासंदर्भात अधिक माहिती देताना निकाळजे म्हणाले, बारामती- बारामती मधील गट नं.गट क्र.६/३/अ, ब, ६/४/अ, ६/४/अ/१,२ मधील जागेमध्ये एस टी महामंडळने मूळ मालकांना विचारात न घेता व जागेचा कोणताही मोबदला न देता बेकायदेशीर ताबा घेऊन त्यावर एस टी बस्थानाकाचे कामचालू आहे. या जागेचा सात बारा उतारे हे आज ही मूळ जमीन मालकांच्या नावावर आहेत. या जागेचे कोणत्याही प्रकारचे संपादन अथवा हस्तांतरण झाले नाही. त्यामुळे ही जागा आज ही मूळ मालकांच्या नावावरील महार वतनाची जागा आहे .या संदर्भात १५ ऑगस्ट २०२३ रोजी उपोषण केले होते, तसेच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बारामती शहरात निषेध मोर्चा देखील काढण्यात आला होता ;परंतु प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दिशाभूलीची उत्तरे देण्यात आली असल्याने निकाळजे यांच्या नेतृत्वामध्ये दि ८ जानेवारी पासून बारामती बस्थानाकासमोर बेमुदत चक्री धरणे आंदोलन चालू आहे .या आंदोलनामधील मागण्या मध्ये गट नं.गट क्र.६/३/अ, ब, ६/४/अ, ६/४/अ/१,२ मधील मूळ मालकांना जागेचा पाच पट मोबदला देण्यात यावा.

गट क्र.६/३/अ, ब, ६/४/अ, ६/४/अ/१,२ मधील मालकी हक्काच्या जागेवर बेकायदेशीर ताबा घेऊन मालकांची फसवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यावर अॅट्रॉसिटी कायाद्या नुसार करवाई करण्यात यावी. बारामती बस्थानकाची जागा ही महार वतनी असल्याने या बसस्थानकाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव बारामती देण्यात यावे तसेच इतर मागण्यासाठी हे आंदोलन सूरू आहे.जो पर्यंत हा विषय मागी लागणार नाही तो पर्यंत बारामती बस स्थानाकाचे उद्घाटन करू देणार नाही व हे बेमुदत चक्री आंदोलन चालू राहणार असल्याची माहिती मंगलदास निकाळजे यांनी दिली .यावेळी जिल्हा उपाध्यक्ष गणेश थोरात,उपाध्यक्ष किरण मिसाळ, सचिव मंगेश लोंढे, सहसचिव कृष्णा साळुंके, शहर सचिव विनय दामोदरे, मोहन शिंदे, सागर गवळी, आनंद जाधव जितेंद्र कवडे, मयूर सोनवणे, शिवाजी सोनवणे, कांता सोनवणे, कविता सोनवणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# देहू शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष पदी विवेक वसंतराव काळोखे



**देहुगांव :** देहु शहराचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष पदी विवेक वसंतराव काळोखे यांची निवड करण्यात आलीअसुन . मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष गणेश खांडगे यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले. यावेळी मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष साहेबराव कारके, देहु नगरपंचायत चे नगराध्यक्षा सौ.पुजाताई दिवटे,नगरसेवक श्री आदित्य टिळेकर,नगरसेवक श्री प्रविण काळोखे,देहू विविधकायर्कारी सोसायटीचे चेअरमन श्री सतिश काळोखे,वाईस चेअरमन श्री शांताराम शेवकर,अजय हगवणे ,संचालक नंदू काळोखे,अमर मोरे,सागर भसे,सागर काळोखे,श्रीराम मोरे,किशोर कदम,महेन्द्र काळोखे ,प्रविण गायकवाड,मयुर गायकवाड,आकाश घोगरे,अभिजित काळोखे,संतोष झेंडे,दिनेश हगवणे,दीपक काळोखे ,युवा नेते पंकज चव्हान,रेहमान सैय्यद,अक्षय धुमाळ तसेच मोठ्या संख्येने तरुण कार्यकर्ते उपस्तित होते

पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडेल आमदार सुनील शेळके संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष गणेश खांडगे यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक उपक्रम राबणार आहे तसेच पक्ष वाढीसाठी कसोटीने प्रयत्न करणार आहे आगामी निवडणुकीमध्ये पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार मिळून आणण्याचा भर असेल **- विवेक काळोखे, नवनिर्चितअध्यक्ष देहु शहर**

# १ कोटी १५ लाख भरल्याशिवाय पुर्नजोडणी नाही

**बारामती :** थकबाकीसाठी बंद केलेल्या मीटरला बायपास करुन उच्चदाबाच्या रोहित्राला थेट केबल जोडून होणाऱ्या वीजचोरीचा महावितरणने ऑगस्ट-२०२३ मध्ये ड्रोनच्या सहाय्याने पर्दाफाश केला होता. केडगाव पोलिसांत महावितरणतर्फे श्री. मुकेश अगरवाल यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करत वीजपुरवठा बंद केला. प्रकरण कोर्टात गेल्याने मा. जिल्हा सत्र न्यायालयाने वीजचोरीच्या दंडातील ७५ टक्के म्हणजेच १ कोटी १५ लाख रुपये रक्कम भरल्याशिवाय वीजपुरवठा पूर्ववत करता येणार नसल्याचा आदेश नुकताच दिला असुन, या आदेशाने वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

सणसवाडी (ता. शिरुर) येथे मुकेश ओमप्रकाश अगरवाल (रा. अग्रसेन सोसायटी, कोरेगाव पार्क, पुणे) यांच्या मालकीच्या तीन वेगवेगळ्या कंपन्या आहेत. पैकी मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि व मे. प्रकाश करुगेटेडे पुणे प्रा.लि ह्या दोन उच्चदाबाचे तर मे. भगवान ट्यूब प्रा.लि. हे लघुदाब ग्राहक आहेत. तिन्ही कंपन्या एकाच आवारात व शेजारी-शेजारी आहेत. थकबाकीमुळे एका कंपनीचा कायमस्वरुपी तर दोन कंपन्यांचा वीजपुरवठा तात्पुरता बंद केलेला असताना संबंधित ग्राहकाने मीटरला बायपास करुन थेट रोहित्रातून वीजचोरी केली. महावितरणला याची कुणकुण लागताच २५ ऑगस्ट रोजी ही वीजचोरी महावितरणने मोठ्या शिताफीने उघडकीस आणली. त्यासाठी ड्रोनचीही मदत घेतली.तीन पैकी दोन वीज जोडण्यांचा वीजपुरवठा सुरु करुन मिळावा म्हणून ग्राहकाने जिल्हा सत्र न्यायालयात दाद मागितली होती. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार वीजचोरी रकमेच्या ७५ टक्के रक्कम ग्राहकाला भरावयाची आहे. त्याशिवाय वीजपुरवठा जोडून मिळणार नसल्याने वीजचोरांचे धाबे दणाणले आहे

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा झेंडा सर्वाधिक कसा फडकेल यासाठी महिलांनी प्रयत्न करावे - मंत्री छगन भुजबळ





**मुंबई :** ज्यावेळी आपण निर्धार करतो, तो कसा करावा यासाठी इतिहासात डोकावून पाहिलं पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविण्याचा निर्धार मां जिजाऊंनी केला होता. त्याचप्रमाणे झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, रमाबाई आंबेडकर, रखमाबाई राऊत यासारख्या महिलांनी निर्धार केला. त्यांच्या पावलावर पाउल टाकून महिलांनी वाटचाल करायला हवी. पक्ष अधिक बळकट करण्यासाठी सर्व समाज बांधवाना सोबत घेऊन महिलां संघटन अधिक मजबूत करून राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीचा झेंडा सर्वाधिक कसा फडकेल यासाठी महिलांनी प्रयत्न करावे असे प्रतिपादन राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मुंबईत आज षण्मुखानंद सभागृहात राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस आयोजित भव्य नारीशक्ती निर्धार मेळावा पार पडला. यावेळी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थित महिला भगिनींना संबोधित केले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री धमर्राज बाबा आत्राम, मंत्री अनिल पाटील,मंत्री अदिती तटकरे, मुंबई अध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, आमदार नितीन पवार, मनोहर चंद्रिकापुरे, उमेश पाटील, महिला पदाधिकारी राजलक्ष्मी भोसले, सुरेखा ठाकरे, आभा पांडे यांच्यासह पदाधिकारी व राज्यभरातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा महिला प्रदेशाध्यक्ष रुपालीताई चाकणकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते.

महिलांनी मां जिजाऊ, झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, रमाबाई आंबेडकर, रखमाबाई राऊत या सारख्या महिलांप्रमाणे आपल्या कामाचा निर्धार करावा असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस आयोजित भव्य नारीशक्ती निर्धार मेळावा पार पडला या मेळाव्यात बोलताना राज्याचे अन्न सुरक्षा व ग्राहक संरक्षण मंत्री तसेच राष्ट्रीय ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी केले.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आपण कुठे आहोत हे आपल्याला बघायला मिळालं आहे. भाजपनंतर आज राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटी अतिशय बळकट आणि राज्यातील नागरिकांचा विश्वास आहे. त्यामुळे पक्षातील संघटन अधिक मजबूत करण्यासाठी महिलांनी सर्व स्थरातील महिलांचे प्रश्न समजून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करावे. गावपातळीवर शहरात वार्ड पातळीवर पक्ष अधिक बळकट करावा.राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटी तुमच्या सोबत आहे असा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण करावा असे आवाहन त्यांनी उपस्थित महिलांना केले.

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लवकरच लोकसभेत देखील महिलांना आरक्षण मिळणार आहे. परंतु पहिली परिक्षा ही ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद ही आहे ही परिक्षा पास झाल्यावर आमदार आणि खासदार येथेही आपल्याला मोठी संधी उपलब्ध होईल.

**- मंत्री व राष्ट्रीय ओबीसी नेते छगन भुजबळ, महाराष्ट्र राज्य**

# गुणवत्ता स्तर निश्चिती अंतर्गत पुणे जिल्ह्यातून श्री ज्ञानेश्वर विद्यालयाला अ श्रेणी प्रदान



**देहुगांव :** शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती असून समाजास उपयुक्त लोकशाहीप्रती निष्ठा असलेले नागरिक घडविण्यासाठी सर्व शिक्षण व्यवस्था कार्यरत आहे. या कार्यामध्ये निकोप स्पर्धा होऊन सातत्याने गुणवत्तेचा आलेख चढता रहावा यासाठी शिक्षण विभाग (माध्य.) जिल्हा परिषद पुणे मार्फत गुणवत्ता स्तर निश्चिती कार्यक्रम 2022 - 23 पुणे जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यान्वित करण्यात आला. सदर स्तर निश्चिती ही उच्च प्राथमिक इयत्ता पाचवी व पूर्व माध्यमिक इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षा निकाल, इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षा निकाल, ठळर (नॅशनल टॅलेंट सर्च) परीक्षा निकाल, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, सारथी शिष्यवृत्ती, इन्स्पायर अवार्ड सहभाग व निवड, चित्रकला स्पर्धा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट), राज्य व राष्ट्रीय (कला, क्रीडा, सांस्कृतिक) स्पर्धा सहभाग या घटकावर करण्यात आली. वरील सर्व घटकांच्या आधारावर मूल्यांकन करून श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आळंदी देवाची गुणवत्ता स्तर निश्चिती मध्ये पात्र होऊन विद्यालयास *अ* श्रेणी प्रदान करण्यात आली. उत्कृष्ट कार्यामुळे पुणे जिल्ह्यातील एकूण ३४ शाळांना गुरुवार दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी सुमन रमेश तुलसियानी कॅम्पस, कामशेत येथे सन्मानित करण्यात आले. यानिमित्ताने प्राचार्य दीपक मुंगसे यांनी जिल्हा परिषदेचे कायर्कारी अधिकारी रमेश चव्हाण, पुणे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्या हस्ते देण्यात आलेला सन्मान चिन्ह व पुष्प पुरस्कार संस्था व शाळेच्या वतीने स्वीकारला. उल्लेखनीय बाब म्हणजे श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या सन्मानादरम्यान आयोजकांनी विद्यालयात सुरू असलेल्या 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची', 'गणित प्रयोगशाळा', 'कलादालन' आदी उपक्रमाचे कौतुक केले व विविध उपक्रमासाठी श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज पाहण्याजोगे असल्याचे सांगितले.

यावेळी शिक्षण उपसंचालक प्रवीण अहिरे, पुणे जिल्हा परिषद माध्यमिकचे शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे, गटशिक्षणाकारी राजेश गायकवाड, पंचायत समिती मावळचे सभापती गुलाब महाळसकर, उपशिक्षणाधिकारी निलेश धानापुणे, शिक्षक, विद्याथी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवटी गुणवत्ता स्तर निश्चिती मध्ये मूल्यांकनास प्राप्त सर्व शाळांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

या निमित्ताने संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर, सचिव अजित वडगावकर व संस्था पदाधिकारी यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कमर्चारी, विद्याथी यांचे कौतुक करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## अंतरमहाविद्यालयीन विमा जागरूकता स्पर्धा

# आयुष वासवानी व नीरज बुधवानी प्रथम




चिंचवड : चिंचवड येथील प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट मधील एम.बी.ए. चे विद्यार्थी आयुष वासवानी व नीरज बुधवानी यांनी पटकाविला.

नॅशनल इन्श्युरन्स अकादमीच्या वतीने भारतीय आयुविर्मा महामंडळाची (एल.आय.सी.) स्थापना करणारे सी.डी. देशमुख यांच्या २५ व्या वार्षिक स्मरणार्थ आंतर महाविद्यालयीन क्विझ स्पर्धा ह्यविमा जागरूकता क्विझह्ण स्पर्धेत आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ४८ महाविद्यालयातील हुशार विद्यार्थ्यांना सहभाग मोठ्या संख्येने नोंदविला होता.

भारतीय आयुविर्मा महामंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ मोहंती यांच्या हस्ते प्रतिभा इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट मधील एम.बी.ए.चे विभाग प्रमुख प्रा.गुरुराज डांगरे, प्रा. तुलिका चटजी समवेत प्रथम क्रमांक पटकाविणारे विजेते एम.बी.ए.चे विद्यार्थी आयुष वासवानी व नीरज बुधवानी यांना भव्य चषक व प्रत्येकी 25 हजारांचा धनादेश प्रदान केला. स्पर्धेत त्यांनी विम्यावरील त्याची प्रतिभा आणि ज्ञान दाखवून स्पर्धा जिंकत उपस्थितांनी मने जिंकली.

कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ.दीपक शहा, खजिनदार डॉ.भूपाली शहा, एम.बी.ए.चे संचालक डॉ.सचिन बोरगावे समवेत प्राध्यापक व शिक्षकेत्तर कमर्चार्यांनी विशेष कौतुक करून त्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्रीराम प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त आई एकवीरा गडावर स्वच्छता अभियान

## मावळ तालुका भाजपा महिला मोर्चाच्या वतीने आयोजन






**वडगाव मावळ :** अयोध्या येथील श्रीराम मंदिर लोकार्पण व प्रभू श्रीराम मूती प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत आई एकवीरा देवी मंदिरात परिसरात मावळ भाजप युवा मोर्चाच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली .

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभर मंदिर व पुजास्थळांची स्वच्छता करण्यात येत आहे. आज अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत आई एकवीरा देवी मंदिरात देवीचे दर्शन घेऊन देवीच्या मुख्य गाभारा व पुजास्थान स्वच्छ करून देवीची मनोभावे पुजा करण्यात आली तसेच देवीचा कळस संपुर्ण पणे पाण्याने धुवून स्वच्छ करून अतर व गुलाब पाण्याने शुद्धी करण करण्यात आले परिसराची साफसफाई करून स्वछए, करण्यात आले

यावेळी माजी मंत्री बाळा भेगडे पुणे जिल्हा भाजपाचे अध्यक्ष शरद बुट्टेपाटील मावळ तालुका निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे भाजपा तालुका अध्यक्ष दत्तभाऊ गुंड ,प्रांतीक सदस्य जितेंद्र बोत्रे ,महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष पुनम चौधरी , लोणावळा नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्ष सुरेखाताई जाधव ,जिल्हा सरचिटणीस संजय रौदळ , लोकसभा समन्वयक कविता हिंगे सभापती गुलाबराव म्हाळसकर ,उपसभापती शांताराम कदम लोणावळा शहराध्यक्ष अरुण लाड , एकवीरा देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त नवनाथ देशमुख ,सागर देवकर ,विकास पडवळ ,प्रदेश युवा मोर्चा उपाध्यक्ष बाळासाहेब घोटकुले , तालुका उपाध्यक्ष मधुकर पडवळ , जिल्हा सरचिटणीस सविता गावडे ,तालुका सरचिटणीस अभिमन्यु शिंदे सचिन येवले , दत्तात्रय पडवळ ,मंगेश देशमुख अमोल भेगडे ,किसन येवले ,गणेश देशमुख , एकनाथ पोटफोडे ,सदाशिव देशमुख ,मच्छिंद्र केदारी ,अरूण भानुसघरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

प्रभू श्रीरामांच्या आगमनाने संपूर्ण देशात उत्साहाचे आणि चैतन्याचे वातावरण आहे. आपली श्रद्धास्थाने म्हणजे मठ, मंदिरे, तीर्थक्षेत्र हे आपले मानबिंदू आहेत. आपण आपल्या मनाच्या शुद्धीसाठी देव दर्शन करतो. त्यामुळे मंदिर परिसराची स्वच्छताची ही देखील तितकीच पवित्र आहे. यामुळे माननीय मोदीजींनी याचेच महत्त्व ओळखून प्रभू श्रीरामांच्या आगमनाच्या अनुषंगाने मंदिर परिसर स्वच्छतेवर भर दिला आहे. त्यामुळे आपण कोणत्याही धर्माचे, पंथाचे वा संप्रदायचे असाल; तरी देखील आपल्या पुजास्थळी जाऊन या स्वच्छता मोहिमेत सहभाग घ्यावाअसे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन भाजप महिला मोर्चाच्या महिला तालुकाध्यक्षा सायली बोत्रे कार्याध्यक्षा सुमित्रा जाधव, कल्याणी ठाकर ,सरचिटणीस वैशाली ढोरे , सरचिटणीस स्वाती पारीठे व महिला मोर्चा मावळ तालुका यांच्या वतीने करण्यात आले होते

# विकसित भारत संकल्प यात्रा हा समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प - राज्यपाल रमेश बैस

## विकसित भारत संकल्प यात्रेअंतर्गत महाशिबिराचे उद्घाटन

**वडगाव मावळ : सतिश गाडे**

देशाच्या विकासासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ समाजातील अंतिम व्यक्तीपर्यंत पोहोचणे गरजेचे असून विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून व्यापक स्तरावर असा प्रयत्न करण्यात येत आहे. हा उपक्रम सामाजिक न्यायावर आधारित समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

विकसित भारत संकल्प यात्रेअंतर्गत मावळ तालुक्यातील कान्हे गावात आयोजित महाशिबीराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कायर्कारी अधिकारी रमेश चव्हाण, पोलीस उप अधीक्षक सत्यसाई कार्तिक, उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू, उपमुख्य कायर्कारी अधिकारी विजयसिंह नलावडे, जिल्हा परिषदेचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जामसिंग गिरासे, मावळचे गट विकास अधिकारी सुधीर भागवत, सरपंच विजय सातकर उपस्थित होते.




केंद्र आणि राज्य शासन एकत्रितपणे नागरिकांना शिक्षण आणि कौशल्याद्वारे सक्षम बनविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नमूद करून श्री.बैस म्हणाले, *नागरिकांना स्वच्छता सुविधा, आवश्यक वित्तीय सेवा, वीज जोडणी, गॅस सिलेंडर सुविधा, गरीबांना हक्काचे घर, खाद्य सुरक्षा, उपयुक्त पोषण, आरोग्य सुविधा, स्वच्छ पिण्याचे पाणी यासारख्या शासनाच्या योजनांचा लाभ देणे हा विकसित भारत संकल्प यात्रेचा भर आहे.* या सुविधांपासून वंचित असलेल्यांपर्यंत पोहोचणे हा यात्रेचा उद्देश आहे. यात्रेच्या माध्यमातून शासन आपल्या दारी आले आहे. लोकसहभागाद्वारे ही यात्रा यशस्वी होऊन पात्र लाभार्थ्यांना खऱ्या अर्थाने लाभ मिळू शकेल, असे त्यांनी सांगितले.

राज्यपाल म्हणाले, यावषी ग्रामीण भाग आणि आदिवासी समाजाच्या विकासावर शासनाने लक्ष केंद्रीत केले आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्यासाठी समाजातील वंचित घटकांचे जीवनमान उंचावणे गरजेचे आहे. पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवून विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून असा प्रयत्न होत आहे.

विकसित भारत हे देशातील सर्वात मोठ्या संपर्क अभियानापैकी एक आहे. २ लाख ५५ हजार ग्रामपंचायत आणि ३ हजार ६०० शहरांमधून या यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. शासनाच्या विविध योजनांसंदर्भात समाजात जागरूकता निर्माण करण्याचे काम या यात्रेद्वारे होत असल्याचे श्री.बैस म्हणाले.

मावळ तालुक्यात लेण्या, किल्ले, सिंचन प्रकल्प, घाट रस्ते आणि मोठ्या प्रमाणात फुलशेती असल्याने पर्यटन विकासाला खूप वाव आहे. पुण्याशी जोडले गेल्याने या परिसराचे शहरीकरणही वेगाने होत आहे, असेही राज्यपाल म्हणाले.

मावळ तालुक्यातील ग्रामीण भागात फिरुन केंद्र शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देणाऱ्या ह्यआपला भारत, विकसित भारतह्ण या चित्ररथाला राज्यपालांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरुपात २० लाभार्थ्यांना विविध योजनांच्या लाभाचे वाटप राज्यपाल श्री.बैस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विविध योजनांची माहिती देणाऱ्या स्टॉलला राज्यपालांनी भेट दिली आणि उपस्थितांशी संवाद साधला.

# मित्रपक्ष भाजपसाठी लोकसभा जागांचा त्याग करणार

## शिरूरची जागा भाजपा लढवणार? मतदारांमध्ये उमेदवाराबाबत उत्सुकता

**पुणे / रमेश जाधव**

काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या 2024 सालच्या लोकसभा निवडणुकीत भाजपने आपकी बार चारशेचे लक्ष निर्धारित केले आहे . मागील लोकसभा निवडणुकीत भाजपने एकूण 437 जागा लढवल्या होत्या . त्यामध्ये भाजपला तीनशेहून अधिक जागांवर विजय मिळविता आला . याचाच अर्थ यावेळच्या निवडणुकीत भाजपा जास्तीत जास्त लोकसभेच्या जागा लढविणार आहे . दरम्यान राज्यात मित्रपक्ष भाजपसाठी जागांचा त्याग करणार का ? हा खरा प्रश्न असून जिल्ह्यातील महत्त्वाची शिरूर लोकसभेची जागा देखील भाजपा लढवू पाहत असून ही जागा भाजपा लढणार का याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे .

भाजपने गेल्या काही महिन्यांपासून राज्यात इतर पक्ष लढवत असलेल्या लोकसभांच्या जागेवर लक्ष केंद्रित केले आहे . त्या अनुषंगाने जिल्ह्यातील शिरूर लोकसभा मतदार संघातील जागेवर देखील निवडणूक लढविण्यासाठी बैठका त्याचबरोबर कार्यकर्त्यांचे संघटन तसेच आढावा बैठका घेतल्याचे दिसून आले आहे . याचाच अर्थ असा होतो की 2024 च्या निवडणुकीत भाजपा शिरूर लोकसभेची जागा लढू पाहत आहे . मात्र सध्यातरी भाजपने ही बाब गुलदस्त्यात ठेवली असून राज्यात महायुतीची सत्ता असल्याकारणाने शिरूर लोकसभेची जागा एकनाथ शिंदे गटाकडे जाते की अजित पवार गटाकडे जाते हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे .

शिरूर लोकसभेसाठी महाविकास आघाडीचे डॉ. अमोल कोल्हे यांचे नाव जवळजवळ निश्चित झाले आहे .मात्र महायुतीकडून शिरूर लोकसभेसाठी कोणता उमेदवार असणार आहे हे मात्र अद्याप स्पष्ट झाले नाही .महायुतीच्या वतीने एकनाथ शिंदे गटाचे माजी खासदार तथा उपनेते शिवाजी आढळराव पाटील यांचे नाव चर्चेत आहे . परंतु भाजपने आपकी बार चार.सौ पारचा नारा दिल्याने शिरूर लोकसभेची जागा देखील भाजपा लढू शकतो असे भाकीत केले जात आहे .भाजपाने शिरूर लोकसभेची जागा लढवण्याचा निर्धार केला तर संभाव्य उमेदवार भोसरीचे विद्यमान आमदार महेश लांडगे हे उमेदवार असू शकतात .

भाजपने 2019 मध्ये राज्यात 25 जागा लढवल्या होत्या आणि 23 जागा जिंकण्यात यश मिळवले होते . एनडीएचा भाग असलेल्या शिवसेनेने 23 जागांवर उमेदवार उभे केले होते आणि 18 जागा जिंकल्या होत्या . शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर राज्यात भाजप आघाडीवर आहे . त्यामुळेच भाजपा इतर पक्षांच्या बालेकिल्ल्यात उमेदवार निवडणुक रिंगणात उतरवु शकतो . सूत्रानुसार भाजपला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला थोड्याफार जागा द्याव्या लागणार आहे .असे असले तरी भाजपने राज्यात तीस ते पस्तीस जागा लढविण्याचा निश्चय केला आहे . 48 जागांच्या महाराष्ट्रात भाजपने पस्तीस जागा लढविल्या तर उरलेल्या 13 जागा एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना आपसात वाटून घ्याव्या लागतील . मात्र पुणे जिल्ह्याचा विचार केला तर जिल्ह्यातील महत्त्वाच्या असलेल्या सध्या महाविकास आघाडीच्या ताब्यात असलेली शिरूर लोकसभेची जागा आपल्या ताब्यात घेण्यासाठी भाजपा उत्सुक असून त्या दृष्टीने भाजपने पावले टाकण्यास आतापासूनच सुरुवात केली आहे . येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत जर का शिरूर लोकसभेची जागा भाजपने लढवली तर एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार गटाला हा मोठा राजकिय धक्का असू शकतो.

# विद्यापीठांनी संस्था बांधणीशास्त्र, नेतृत्वशास्त्र आणि संघटनशास्त्र या ज्ञानशाखा निर्माण कराव्यात - डॉ. विनय सहस्त्रबुद्धे

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२३ वा पदवी प्रदान समारंभ उत्साहात संपन्न

**पुणे:** विद्यापीठांनी संस्था बांधणीशास्त्र, नेतृत्वशास्त्र आणि संघटनशास्त्र यांसारख्या उपायोजनक्षम ज्ञानशाखा निर्माण कराव्यात. जेणेकरून वैचारिक दांभिकतेचे आकर्षण मुळापासून नष्ट होण्यास मदत होईल, असे वक्तव्य आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी केले. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी पद्रान समारंभात बोलत होते. विद्यापीठाचा १२३ वा पदवी प्रदान समारंभ आज १७ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला. राज्याचे मा. राज्यपाल तसेच विद्यापीठाचे कुलपती मा. श्री रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पदवी प्रदान समारंभात प्रमुख पाहूणे म्हणून आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे उपस्थित होते. यांच्यासह व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. (डॉ.) विजय खरे, वित्त व लेखा अधिकारी सीएमए चारूशिला गायके, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे आदी उपस्थित होते. या समारंभात १ लाख ५ हजार ६५४ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. विद्यापीठ यावषी आपले अमृत महोत्सव वर्ष साजरे करत आहे. त्यामुळे यावषीचा पदवी प्रदान सोहळा खास ठरला.






सध्या विद्यापीठीय वातावरणात संस्था बांधणी या विषयाची होत असलेली उपेक्षा संपवून नव्या व काल सुसंगत विषयांवर काम करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे विद्यापीठाने संस्था बांधणी ही नवीन ज्ञान शाखा सुरू करावी. तसेच विद्यापीठ सारख्या संस्थांचे संस्था बांधणी किंवा लेखा परीक्षण घडवून आणले पहिजे असे मत डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले. तसेच आधुनिक प्रबंधन शास्त्राच्या चौकटीत नेतृत्व शास्त्र, संघटन शास्त्र आणि संस्था बांधणी शास्त्र असे तीन्ही ज्ञान प्रवाह विकसित व्हायला हवे असल्याचेही ते म्हणाले. तर समाजात वैचारिक दांभिकपणा, मध्यामांप्रती स्नेह वाढत चाललेला आहे. त्यामुळे हे सर्व टाळायचे असेल तर नव्या पिढीला समाज - संबंध शास्त्र अशा प्रकारच्या एक नव्या सर्वकष ज्ञान शाखेचे शिक्षण देण्याची व्यवस्था आपल्याला करावी लागेल, असेही यावेळी डॉ. सहस्त्रबद्धे म्हणाले.

गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाचे उद्दीष्ट केवळ रोजगार निमिती एवढे मर्यादीत नसून एक जीवंत, समाज संलग्न, सहयोगी समुदाय आणि एक समृद्ध राष्ट्र निमितीची किल्ली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल श्री. रमेश बैस यांनी यावेळी केले. ज्ञान केवळ माहितीचा संग्रह नसल्याचे नमूद करून राज्यपाल म्हणाले, ज्ञानाच्या आधारे नवसंस्कृती उभी राहते, ज्ञानामुळे प्रगतीचा मार्ग सुकर होतो. ज्ञान नाविन्य आणि परिवतर्नाचे उत्प्रेरक आहे. ज्ञान माणसाला योग्य निर्णय घेण्यास सक्षम आणि जीवनातील अडचणींवर मात करण्यायोग्य बनविते. ते प्रश्न विचारणे, विश्लेषण करणे आणि मूल्यांकन करण्यासाठी माणसाला प्रोत्साहित करते. ज्ञान वतर्मान आणि भविष्याला जोडणारा सेतू असल्याने उच्च शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञाननिमिती करून विद्याथी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत योगदान देऊ शकतील, असा विश्वास श्री.बैस यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत विद्यापीठ देशपातळीवर आघाडीवर आहे. पायाभूत आणि ज्ञान शाखांचे सक्षमीकरण करणे, सर्वसमावेशक शिक्षणाची कास धरणे हे पुढील ५ वर्षाचे ध्येय असल्याचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी म्हणाले.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ह्यविद्यापीठ वार्ताह्ण या पदवीप्रदान विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. राज्यपालांच्या हस्ते विविध परीक्षांमध्ये प्रावीण्य संपादन केलेल्या १० विद्यार्थ्यांना सुवर्ण पदके देऊन सन्मानित करण्यात आले. यात नाशिकमधील अशोका सेंटर फॉर बिझनेस अँण्ड कॉम्प्युटर स्टडिज महाविद्यालयातील श्रीमती रिद्धी सुनिल कलंत्री या विद्यार्थीनीला ह्यद प्रेसिडेंट ऑफ इंडिया शंकर दयाल शर्मा सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. तसेच विद्यापीठाच्या कमवा व शिका योजनेंतर्गत सन २०२२-२०२३ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्जतमधील रयत शिक्षण संस्थेचे दादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राजक्ता प्रमोद पठाडे या विद्यार्थीनीचा ह्यश्रीमती निलिमाताई पवार सुवर्णपदक देऊन सन्मान करण्यात आला. यांच्यासह वनस्पती शास्त्र विषयातील उत्कृष्ट पीएचडी थिसीससाठी सतिशकुमार मौर्य, गणित विषयातील उत्कृष्ट पीएचडी थिसीससाठी अमोल सोनवणे, मराठी विषयातील उत्कृष्ट पीएचडी थिसीससाठी विजय कामडी, इतिहास विषयातील उत्कृष्ट पीएचडी थिसीससाठी राहुल मगर, विज्ञान शाखेत गुणवत्ता प्राप्त गंगाधर किटाळे, संजू पांडे, एमबीए ट्राय सेमिस्टरमध्ये प्रथम क्रमांक मिळवणारी विग्यान पटिएल यांचा सुवर्णपदक देऊन सन्मान करण्यात आले.

**१ लाख ५ हजार ६५४ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र**

विद्यापीठाच्या इनडोअर हॉलमध्ये झालेल्या या सोहळ्यात ८५ हजार ४४० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र, १९ हजार ७६८ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र, २२६ विद्यार्थ्यांना पदविका प्रमाणपत्र, १८७ विद्यार्थ्यांना पीएच.डी., ३४ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी पदविका प्रमाणपत्र तर ४ विद्यार्थ्यांना एम.फिलचे प्रमाणपत्र अशा एकूण १ लाख ५ हजार ६५४ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले. या कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्या परिषद सदस्य, अधिसभा सदस्य यांच्यासह विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्माचारी आणि विद्याथी उपस्थित होते.

**सहा सुवर्णपदक**

नाशिकमधील अशोका सेंटर फॉर बिझनेस अँण्ड कॉम्प्युटर स्टडिज महाविद्यालयाच्या मुजेन कोकणी या विद्यार्थीनीने एमबीए परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्यामुळे सर्वाधिक सहा सुवर्णपदक मिळवले

## महत्त्वाचे

### शासनमान्य ग्रंथालयांना पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी ९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालय सेवा मिळाव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार', ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार' देण्यात येतो.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ ब क ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रुपये १ लाख, रुपये ७५ हजार, रुपये ५० हजार व रुपये २५ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी रुपये ५० हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता व उत्कृष्ट सेवक यांना प्रत्येकी रुपये २५ हजार रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. सन २०२२-२३ या वर्षातील पुरस्कारासाठी इच्छूक ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी पुरस्कारासाठी विहित नमुन्यातील अर्ज तीन प्रतीत मुदतीत त्यांच्याजिल्हयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# मनोज जरांगे पाटील लढविणार लोकसभेची निवडणूक?

## गरीब मराठ्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी राजकारणात प्रवेश करण्याचे आवाहन



**मुंबई:** गरीब मराठा समाजाचा आवाज बुलंद करण्यासाठी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रत्यक्ष राजकारणात उतरून लोकसभेची निवडणूक लढवावी, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देऊन जरांगे पाटील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार का, याबद्दल राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

गरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी तब्बल ३५ वर्षांपूर्वीपासून लढा दिला जात आहे. मात्र, समाजातील प्रस्थापित श्रीमंत नेते मंडळींनी या लढ्याला आवाज आणि आकार मिळू दिला नाही. जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाने गरीब मराठ्यांच्या मागण्यांसाठीच्या संघर्षाला आवाज आणि आकार प्राप्त झाला आहे. तो बुलंद करण्यासाठी जरांगे पाटील यांनी लोकसभेत जावे, अशी अपेक्षा आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन इतर मागासवर्गीय प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी जरांगे पाटील यांनी लढा उभारला असून त्याला बहुसंख्य मराठा समाजाचा पाठिंबा मिळत आहे. याच मागणीसाठी लाखो आंदोलकांना घेऊन जरांगे पाटील उद्या मुंबईकडे कूच करणार आहेत. ते २६ जानेवारीला मुंबईत पोहोचणार असून त्यानंतर आरक्षण मिळेपर्यंत राजधानीत आंदोलन सुरू राहणार आहे.

जरांगे पाटील यांनी मुंबईत येऊन आंदोलन करू नये यासाठी राज्य सरकारकडून जंग जंग पछाडले जात आहे. आतापर्यंत मिळालेल्या ५४ लाख कुणबी मराठा, मराठा कुणबी नोंदीच्या याद्या प्रसिद्ध करून संबंधितांना प्रमाणपत्र देण्यासाठी मुख्य सचिवांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांसाठी आदेश काढला आहे. त्याचप्रमाणे मराठा समाजाचे मागासपण ठरविण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाने कालबद्ध कार्यक्रम निश्चित केला आहे.

मात्र, जरांगे पाटील मुंबईत आंदोलन करण्यावर आणि आरक्षण मिळवल्याखेरीज माघार नाही, या भूमिकेवर ठाम आहेत. त्यातच त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला तर राजकारणातील अनेक प्रस्थापितांचे धाबे दणाणल्याशिवाय राहणार नाहीत.

# मळीच्या निर्यातीवर ५० टक्के शुल्क

**कोल्हापूर :** देशांतर्गत घटलेले इथेनॉल उत्पादन वाढवण्यासाठी केंद्र सरकारने मळीच्या निर्यातीवर ५० टक्के निर्यात शुल्क लागू केले आहे. यामुळे मळीची निर्यात थांबून ती इथेनॉल निर्मितीसाठी उपलब्ध होणार आहे. गेल्या काही दिवसांत साखर, कांदा निर्यातबंदीपाठोपाठ आता मळीच्या निर्यातीवरही वाढीव शुल्क लावले गेले आहे.

केंद्र सरकारने हरित ऊर्जा असलेल्या इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे ठरवलेले आहे. यावर्षीच्या ऊस हंगामाची परिस्थिती पाहता इथेनॉल निर्मितीबाबतचे निर्णय सतत बदलत असल्याचे दिसून आले आहे. यंदा उसाचे उत्पादन कमी होणार असल्याने पर्यायाने साखर निर्मिती कमी होणार हे लक्षात घेत केंद्र सरकारने सुरुवातीला उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मिती करण्यावर बंदी घातली होती. मात्र नंतर साखर उद्योगांनी याबाबतच्या अडचणी मांडल्यानंतर काही प्रमाणामध्ये उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मिती करण्यास परवानगी दिली.

त्यानंतर साखर उद्योगाकडून मळीवर निर्यात लागू करावी अशी मागणी ऑक्टोबर महिन्यापासून केली जात होती. भारत हा मळी निर्यातीतील प्रमुख निर्यातदार देश असून जागतिक व्यापारात भारताचा हिस्सा २५ टक्के इतका आहे. साखर उद्योगाच्या मागणीची दखल चार महिन्याने घेतली आहे. तथापि, केंद्र सरकारने मळी निर्यात बंदी करण्याऐवजी त्यावर ५० टक्के निर्यात शुल्क लागू केले आहे.

# डॉ अशोकराव माने यांनी श्री राम मंदिरात केली स्वच्छता



श्रीराम मंदिराची स्वच्छता करताना दलित मित्र अशोकराव माने

**शिरोळ :** आयोध्या येथील श्री राम जन्मभूमीत होणाऱ्या श्री रामलल्ला मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने शिरोळ येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे या धार्मिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर माजी जिल्हा परिषद सदस्य व हातकणंगले विधानसभा मतदारसंघाचे भाजपा व जनसुराज्य शक्ती पक्षाचे नेते दलित मित्र डॉ अशोकराव माने यांनी शुक्रवारी सकाळी येथील श्री राम मंदिरात येऊन मंदिर आवारात स्वच्छता केली

श्री राम जन्मभूमी आयोध्या येथे नव्याने उभारण्यात आलेल्या तीन मजली श्री राम मंदिरातील तळमजल्यात श्री रामाची बाल अवस्थेतील श्री रामलल्ला या मूर्तीची प्रतिष्ठापना सोमवारी होणार आहे या निमित्ताने या दिवशी देशभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे शिरोळ येथील श्रीराम मंदिरात यानिमित्ताने धार्मिक कार्यक्रम व महाप्रसाद होणार आहे

श्री राम मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने भाजपाच्या वतीने सर्व मंदिरांची स्वच्छता करण्यात येत आहे त्यामुळे भारतीय जनता पार्टी व जनसुराज्य शक्ती पक्षाचे हातकणंगले विधानसभा मतदारसंघाचे नेते दलित मित्र डॉ अशोकराव माने यांनी शुक्रवारी सकाळी श्री राम मंदिरात येऊन मंदिरात झाडलोट करत फरशी पुसून स्वच्छता केली.

यावेळी श्री गुरुदत्त शुगर्सचे संचालक शिवाजीराव माने - देशमुख शिवाजीराव जाधव - सागले माजी नगरसेवक विजय उर्फ दादासो कोळी श्रीराम मंदिर उत्सव समितीचे प्रमुख दिलीपराव माने रामचंद्र पाटील बाळासाहेब कोळी बजरंग काळे चंद्रकांत भाट सागर कोळी बबन बन्ने ओंकार माने बाळासो खौंद्रे अभिजीत गावडे यांच्यासह श्रीराम भक्त उपस्थित होते.

# खासगी क्लासेससाठी सरकारची नवी नियमावली जारी

## प्रवेशप्रक्रियेसह 'या' मुद्द्यांचा केला समावेश!

**मुंबई :** गेल्या काही वर्षापासून खासगी कोचिंग क्लासेसचे प्रस्थ वाढले आहे. चांगल्या शाळा-कॉलेजात प्रवेश घेतल्यानंतर पालक आपल्या पाल्याला चांगल्या शिक्षणाच्या आशेने खासगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घेऊन देतात. पालकांचा ओढा जास्त वाढल्याने खासगी कोचिंग क्लासेसचालकांनीही खोटी आमिषे आणि फसव्या जाहिराती करून पालकांना आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, आता शिक्षण मंत्रालयाने या सर्वांवर चाप लावण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षण मंत्रालयाने नवे मार्गदर्शक तत्वे जाहीर केले असून त्यानुसार, १६ वर्षापेक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्यांची ते नोंदणी करू शकत नाहीत. तसंच, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि चांगल्या गुणांची हमी देणे बेकायदेशीर ठरवण्यात येणार आहेत. कायदेशीर चौकटीची गरज आणि खाजगी कोचिंग केंद्रांच्या अनियंत्रित वाढीचे व्यवस्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांच्या आत्म हत्यांच्या वाढत्या घटना, कोचिंग क्लासेसमध्ये आगीच्या घटना वाढल्याने, कोचिंग क्लासेसमध्ये सुविधांचा अभाव तसेच त्यांनी अवलंबलेल्या अध्यापनाच्या पद्धतींबाबत सरकारकडे आलेल्या तक्रारींनंतर मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत.

# माण-खटावसह सांगोल्याची पाण्यासाठी अजूनही वणवण



**बिदाल :** खासदार रणजितसिंह निंबाळकरांनी माढा निवडणूक लढवण्याचा निर्णयानेच येथील जनतेच्या अपेक्षा वाढल्या होत्या. आपला दुष्काळाचा प्रश्न निकाली निघेल, अशी जनतेला आशा होती मात्र निंबाळकरांच्या पाच वर्षांचा कार्यकाळ संपत आला तरीही येथील जनतेला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कामे झाले नाहीत. तरीही येथील जनतेचा पाण्याचा प्रश्न मिटला नसल्याने निंबाळकरांचे माढ्यातील लोकप्रतिनिधित्व कोरडेच असल्याचे इंजि रामचंद्र घुटुकडे म्हटले आहेत.

रणजितसिंह निंबाळकर खासदार म्हणून नेतृत्व केले तरी अजून सुद्धा माण-खटाव, सांगोला, माळशिरस, मधील लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावं लागते. माढा लोकसभा मतदारसंघातील तरुणांना रोजगार नसल्याने पुणे, बारामती, सोलापूर, मुंबई, सांगली या शहरात स्थलांतर करावे लागते. खासदार निंबाळकरांच्या उमेदवारीचे माढ्यातही पडसाद उमटू लागलेत. माढ्यात विकासगंगा आणतील असे मतदारांना वाटले होते. मात्र, गेल्या पाच वर्षांत तसे काहीही बदल होताना दिसले नाही.

## खासदार धैर्यशिल माने : हेरवाड येथे ४४ लाखाच्या विविध विकास कामांच्या शुभारंभ

# हेरवाडच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही



**कुरुंदवाड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि स्वराज्याचे ऐतिहासिक हेरखाते असलेल्या हेरवाड गांवचा विकास साधण्याचे भाग्य मला लाभले. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी महायुतीचे सरकार कमी पडणार नसून भविष्यातही हेरवाड गांवचा विकासाच्या माध्यमातून कायापालट करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. असे प्रतिपाद खासदार धैर्यशील माने यांनी केले.

हेरवाड येथे ४४ लाखाच्या विविध विकास कामांच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी हनुमान मंदिर यात्री निवास, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज विकास योजनेतून दलित वस्ती अंतर्गत रस्त्याचा शुभारंभ, मातोश्री ग्राम समृद्धी पानंद रस्त्या अंतर्गत देसाई मराठी इंगळे मळा रस्त्याचा शुभारंभ खासदार धैर्यशील माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना खासदार धैर्यशील माने पुढे म्हणाले, मतदार संघाचा विकास साधण्यासाठी ग्रामीण भागाचा पाया रचने महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागाचा विकास झाला तर खऱ्या अर्थाने सर्वसामान्य माणसाचा विकास होणार असल्याने सध्या असलेल्या शिंदे फडणवीस आणि पवार या तीन इंजिन सरकारमुळे कोट्यावधी रुपयांची कामे करता येत आहेत. या विकास कामामुळेच मतदार संघाचा काया पलट करता आला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष राकेश खोंद्रे, बाबासाहेब वनकोरे, चंद्रकांत मोरे, कृष्णा नरके, सरपंच रेखा जाधव, उपसरपंच हयाचांद जमादार, दिलीप उर्फ मफत पाटील, माजी सरपंच सुरगोंडा पाटील, अनिल अकिवाटे, जितेंद्र देसाई, अर्जुन जाधव यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळव्यात भगव्या पताका आणि आव्हाड समर्थकांकडून रामाचा नारा!

**ठाणे :** प्रभु श्रीराम हे मांसाहारी असल्याचे वादग्रस्त विधान केल्यामुळे टिकेचे धनी ठरलेले राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांनी आता रामाचा नारा देण्यास सुरूवात केली आहे. या समर्थकांकडून आव्हाड यांच्या मतदार संघातील कळवा परिसरात आठ हजार भगव्या झेंड्यांचे वाटप करण्यात आलेले असून हे झेंडे सर्वत्र लावण्यात आलेले आहेत. यामुळे कळवा परिसरात भगवामय झाल्याचे दिसून येत आहे. तसेच या राममय वातावरण निर्मीतीच्या माध्यमातून त्यांचे समर्थक आव्हाडांना धक्का देण्याच्या तयारीत तर नाही ना, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

आयोध्या येथे २२ जानेवारीला राम मंदीर उद्धाटन आणि मुर्ती प्रतिष्ठापना होणार आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सर्वत्र रामाचा जप सुरू झाला आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनात भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि त्यांच्या पक्षाशी संबंधीत संस्था आघाडीवर असल्याचे दिसून येते.

राम मंदीराच्या मुद्दयावरून राजकारण होत असल्याची टिका भाजपवर विरोधकांकडून केली जात आहे. असे असतानाच, प्रभु श्रीराम हे मांसाहारी असल्याचे विधान करून राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी वाद ओढावून घेतला होता. हा वाद काहीसा शमल्याचे चित्र असतानाच, आता आव्हाड समर्थकांनी रामाचा जप सुरू केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

आव्हाड यांच्या समर्थकांनी कळवा परिसर भगवामय करत राम घराघरात पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे.

यानिमित्ताने टिकेनंतर आव्हाड समर्थकही रामाकडे वळल्याचे चित्र आहे. जितेंद्र आव्हाड यांच्या मतदार संघातील कळवा परिसरात त्यांच्या समर्थकांनी आठ हजार भगव्या झेंड्याचे वाटप केलेले आहे. या झेंड्यांवर रामाचे आणि मंदीराचे चित्र आहे. हे झेंडे परिसरातील रस्ते, इमारतींवर लावण्यात आलेले आहेत. 'मन और घर मे जय श्रीराम' या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आव्हाड समर्थकांकडून सांगण्यात येत आहे.

# खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनी 'अमृत'च्या योजनांचा लाभ घ्यावा!

**जळगाव :** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शासनाच्या इतर कोणत्याही विभाग, महामंडळ, संस्था यांच्याकडून लाभ मिळत नाही, अशा आर्थिक दुर्बल घटकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी 'अमृत' (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे) या संस्थेची राज्य सरकारने स्थापना केली आहे. 'अमृत' हा राज्य सरकारचा महत्वकांक्षी प्रकल्प आहे, या संस्थेच्या लाभार्थ्यांनी संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपले जीवनमान उंचवावे, व आपली उन्नती करावी, असे आवाहन 'अमृत' संस्थेचे अधिकारी व जळगाव, धुळे-नंदूरबार जिल्ह्यांचे पालक अधिकारी हरिष भामरे यांनी येथे केले. 'अमृत'च्या विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती घेऊन स्वतंत्र अर्ज दाखल करावेत, असेही भामरे म्हणालेत.

जळगाव येथे बुधवारी (दि.१७) विविध सामाजिक मान्यवर व लाभार्थ्यांसोबत महत्वपूर्ण बैठक, विविध प्रशासकीय अधिकार्यांशी चर्चा आदींचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भामरे यांनी लाभार्थ्यांना 'अमृत'च्या विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सर्व योजनांचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही हरिष भामरे यांनी याप्रसंगी केले.

# नियमा विरोधात माती, दगड वाहतूक करणारे ट्रकवर कारवाई होणार का?



बाणेर ,बालेवाडी रमेश जयस्वाल बाणेर, बालेवाडी,औध विभागात अनेक बांधकामाची कामे सूरू आहे यांच्या ट्रक मधून वाहतूक केल्या जाणारे ऊघड्यावर माती,दगड, गिट्टी ,मूरूम सिमेंटमूळे ईतर टूव्हिलर वर चालणारे चालक यांना त्रास सहन करावा लागत आहेअसे वाहतूक करणारे ट्रक वर शासनाने अनेक नियम केले असले तरी याची वाहतूक विभागाकडून पायामल्ली होत असल्याचे दिसते.

शासनाने सर्वसामान्य जनतेला वाहतूक करतांना त्रास होऊ नये म्हणून बांधकाम करणारे आणि त्यामाध्यमातून माती, गिट्टी, मूरूम, दगड, सिमेंट वाहतूक करणारे ट्रकमुळे जनतेला त्रास होऊ नये म्हणून हे ट्रक वाहतूक करतांना वाहनावर प्लास्टिक आवरण टाकून वाहतूक करण्याची परवानगी दिली आहे ट्रक ,डंफर मध्ये ऊघड्यावर माती,दगड,मुरूम गिट्टी,सिमेंट वाहतूक करत असेल तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल असे अध्यादेश काढून जाहिर केले होते परंतू या विभागात राजेरोसपणे खूलेआम ट्रक ,डंफर मध्ये दगड,मातीची वाहतूक होत आहे रोज वाहन चालक टूव्हिलर असो की ईतर पाईचालरे जनतेला त्रास भोगावा लागत आहे या वाहतूक करणारे वाहनामधून माती,दगड,मुरूम सिमेंट ऊघड्यावर वाहतूक करण्याच्या प्रकारा मूळे अनेक ठिकाणी टूव्हिलर वाहनाचे अपघात सुध्दा झाले आहे ऊघड्यावर वाहतूक करणारे साहित्य माती, मूरूम ट्रक मधून ऊडते या कारणाने अनेक अपघात झाले होते. तर गिट्टी,दगड वाहतूक करणारे वाहना मधून स्पिड ब्रेकर वरून वाहन जंप घेतांना अनेक ठिकाणी दगड,गिट्टी रोडवर किंवा ऐखाद्या वाहन चालकावर पडण्याच्या घटना अनेक वेळे घडल्या आहे'वाहतूक नियमाची पायामल्ली करण्याचा प्रकार या विभागात घडत आहे रोज राजेरोस पणे दिवसाढवळ्या वाहतूक करणारे ट्रकवर वाहतूक विभाग का कानाडोळा करत आहे हा जनतेत प्रश्न पडला आहे.

# वसंतनानांनी भिडस्त भावना बाजूला ठेवून राजकारण करावे : उज्वल निकम



**पंढरपूर :** वसंतनाना देशमुख यांनी आजपर्यंत आपल्या राजकीय कारकीर्दीमध्ये भिडस्त स्वभाव घेऊनच ते वावरलेले आहेत. त्यांच्या स्वभावामध्ये कोणाला नाराज न करण्याची ही जी भिडस्त भावना आहे. या भावनेला आता थोडसं बाजूला करून त्यांनी आता निर्भीडपणे राहिलं पाहिजे आणि वागले पाहिजे तरच त्यांना पुढील राजकीय कारकिर्दीमध्ये प्रगती करता येईल. असे विधीतज्ञ उज्वल निकम यांनी वसंतनाना देशमुख यांच्या ६१ समारंभाच्या सत्कार प्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या. उज्वल निकम साहेबांनी आपल्या मनोगत मधून त्यांनी २०२४ मध्ये येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आपली उमेदवारी वसंतनाना देशमुख यांनी जाहीर करावी अशीच अपेक्षा व्यक्त केली की काय अशी चर्चा सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नेते, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, विशेष सरकारी वकील उज्वल निकम उपस्थित होते.

यावेळी सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी आपल्या शैलीमध्ये कॉलेज जीवन, राजकारणातील जीवन या गोष्टीवर सविस्तर बोलत त्यांनी कासेगाव मधील प्रामाणिक राजबिंडा युवक आपल्या लोकसंग्रहाच्या जीवावर त्यांनी आपले कासेगाव गटामधील राजकीय अस्तित्व आबादीत ठेवण्याचे कार्य केले. पैशापेक्षा जनतेच्या प्रेमाला त्यांनी महत्त्व दिले. असे उद्गार वसंतनाना देशमुख यांच्या बद्दल काढले. ते पुढे बोलताना म्हणाले की आज पंढरपूर तालुक्यांमध्ये विधानसभेसाठी असंख्य लोक इच्छुक असलेले दिसून येत आहेत. पवार साहेबांच्या कडेने रिंगण घालू लागलेले आहेत. आम्ही आमच्या राजकीय जीवनामध्ये शरद पवार यांच्याकडेने असंख्य रिंगण घातले परंतु काय उपयोग झाला नाही. म्हणून आम्ही शिवसेना,भाजपाला जवळ केले. असा सल्ला यावेळी उपस्थित नेतेमंडळींना दिला. शेवटी सत्काराला उत्तर देताना वसंतनाना देशमुख म्हणाले की आयुष्यात राजकारण करीत असताना विरोधक,असो की स्वपक्षीय कार्यकर्ते,नेते असो कधीही दुजाभाव केला नाही. आयुष्यात पैश्यापेक्षा माणसे कमावणं महत्वाचे आहे.हे सूत्र मी पाळत गेलो. लोकांच्या कामासाठी व त्यांचे हितसंबंध जपण्यासाठी आपण राजकारणात कार्य करीत राहिलो.पदाचा वापर कधीही गैर केला नाही.लोकांची काम करीतकरीत कधी एकसष्ठी मध्ये आलो हे कळले नाही.लोकांचे प्रेम आणि सहकार्याने आज मी येथे पर्यंत पोहचलो आहे.असेच प्रेम, सहकार्य लोकांचे रहावे. अशी भावना सत्कारमूर्ती वसंतनाना देशमुख यांनी व्यक्त केली.

## भूसंपादनाचा कोल्हापूर जिल्ह्यात शेवटचा टप्पा

# नागपूर-रत्नागिरी महामार्ग : बदललेल्या निर्णयाने ७०० कोटींचा तोटा



कोल्हापूर : नागपूर-रत्नागिरीमहामार्गासाठी अंकली पूल ते चोकाक येथील भूसंपादनासाठी शेतकरी व बाधितांना दिली जाणारी रक्कम म्हणजे तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार झाला आहे. या महामार्गासाठीच्या १०७ किलोमीटरसाठी बाजारभावाच्या चारपट रक्कम दिली गेली तर आता उरलेल्या ३८ किलोमीटरसाठी रेडिरेकनरच्या दोनपट रक्कम देण्यात येत आहे. राज्य शासनाने २०२१ साली काढलेल्या या अधिसूचनेचा फटका बाधितांना बसला असून, त्यांचे जवळपास ७०० कोटींचे नुकसान होणार आहे.

नागपूर ते रत्नागिरी या १६६ क्रमांक राष्ट्रीय महामार्गासाठीच्या भूसंपादनाचा जिल्ह्यातील शेवटचा टप्पा सुरू झाला आहे. पहिल्या टप्प्यात आंबा ते पैजारवाडी, दुसऱ्या टप्प्यात शाहूवाडी ते पन्हाळा व तिसऱ्या टप्प्यात पैजारवाडी ते चोकाक येथील मिळकतींचे संपादन केले जात आहे. आतापर्यंत झालेल्या दोन्ही टप्प्यांमधील बाधितांना मिळकतींच्या बाजारमूल्याच्या चारपट घसघशीत रक्कम दिली गेली. आता शेवटच्या टप्प्यातील भूसंपादनासाठी निकष बदलल्याने ज्यांना कोटीत रुपये मिळणे अपेक्षित होते त्यांना आता ५०-६० लाख रुपये मिळणार आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे.

### तिसरा महामार्ग

**मौजे तमदलगेमधील १०.८७१ हेक्टर जमीन संपादित होणार आहे. याच रस्त्यासाठी २०१२ मध्ये संपादन झाले आहे. पण, संपादन केलेला भाग सोडून दुसऱ्याच बाजूने रस्ता होणार आहे. पूर्वीचे दोन महामार्ग या गावातून गेले आहे, आता तिसऱ्या महामार्गासाठी शासकीय, अधिग्रहित जमिनीचा विचार न करता पुन्हा भूसंपादन केले जात आहे.**

काय आहे शासन निर्णय

राज्य शासनाने ६ ऑक्टोबर २०२१ रोजी नवा अध्यादेश काढला असून, त्यात मोबदल्याच्या रकमेचा गुणांक १ दिला आहे. तसेच जमिनीचे मूल्यांकन करताना नोंदणी महानिरीक्षकांकडून जाहीर होणाऱ्या टप्पा पद्धतीच्या धर्तीवर जमिनींच्या निर्धारित बाजार दर मूल्यांकनात २० टक्के कपात करण्यात येईल.

माझ्या ३ गुंठे जागेतच शेत, घर, गोठा आहे. हे सगळे रस्त्यात गेल्यावर माझ्याकडे काहीच राहणार नाही. दुसरीकडे जागा घ्यायची म्हणजे महामार्ग होणार म्हणून लोकांनी जमिनीचे दर वाढवून ठेवले आहेत. शासनाचा दर बघितला तर

### हा तर थेट अन्याय..

**एकाच महामार्गासाठी दोन वेगवेगळे दर हा अन्याय आहे. रेडिरेकनरचा दर मुळातच फार कमी असतो. त्यावर दोन पट म्हणजे लाखोंचे नुकसान होणार आहे. या टप्प्यात उदगाव, उमळवाड, जैनापूर, निमशिरगाव, तमदलगे, मजले, हातकणंगले, चोकाक, अतिग्रे, आजगाववाडी व अंकली (जि. सांगली) ही गावे येतात. या गावातील ८०० हून अधिक शेतकरी, रहिवासी व व्यावसायिक बाधित होणार आहे, तर अधिसूचनेतील बदलामुळे जवळपास ७०० कोटींचे नुकसान होणार आहे.**

## 'संवाद तक्रारदारांशी'मध्ये ७४ तक्रारदारांचा सहभाग

**सातारा** : सातारा जिल्हा पोलिस दलाच्यावतीने गुरुवारी 'संवाद तक्रारदारांशी' या राबवलेल्या उपक्रमात ७४ तक्रारदारांनी सहभाग घेवून तक्रारी नोंदवल्या.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, जिल्ह्यातील सहा उपविभागीय कार्यालयात हा उपक्रम पार पडला.

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसर्या गुरुवारी हा उपक्रम राबवला जात आहे. तक्रारदारांच्या ज्या तक्रारी आहेत त्या त्यांनी नजीकच्या पोलिस उपविभागीय कार्यालयात (डीवायएसपी) मांडव्यात. पोलिसांनी राबवलेल्या या उपक्रमामुळे तक्रारदारांचा वेळ व पैसा वाचत आहे.

## चोराडे घरफोडीतील संशयित जेरबंद; मुद्देमाल हस्तगत

**सातारा** : चोराडे ता.खटाव येथे घरफोडी करुन सुमारे ६ लाख १० हजार रुपये किंमतीची साउंड सिस्टीम चोरी केल्याप्रकरणी शुभम रमेश मोहिते (वय ३०, रा. तोंडोली ता.कडेगाव जि.सांगली) याला सातारा पोलिसांनी अटक केली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी चोराडे ता.खटाव येथून पत्र्याच्या शेडमधून अज्ञाताने साउंड सिस्टीम, स्पीकर असे साहित्य चोरुन नेले. याप्रकरणी औंध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. स्थानिक पोलिस तसेच सातारा स्थानिक गुन्हे अन्वेषन विभाग या चोरीचा तपास करत असताना त्यांना तांत्रिक तपासामध्ये धागेदोरे मिळाले. त्यानुसार पोलिसांनी शुभम मोहिते याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली. चोरी केलेल्या साउंड सिस्टीमबाबत पोलिसांनी त्याला विचारले असता त्याने ती उसाच्या शेतात ठेवली असल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी साउंड सिस्टीम जप्त केली.

दरम्यान, साउंड सिस्टीम चोरी करण्यासाठी शुभम मोहिते याने दुचाकीचाही वापर केल्याचे समोर आले. यामुळे गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही सातारा एलसीबीने जप्त केली. पोलिस अधीक्षक समीर शेख, अपर पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अरुण देवकर, सपोनि सुधीर पाटील, फौजदार विश्वास शिंगाडे, पोलिस विजय कांबळे, मंगेश महाडीक, साबीर मुल्ला, अमोल माने, मुनीर मुल्ला, अमित झेंडे, स्वप्नील दौंड यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# क्राईम

'संवाद तक्रारदारांशी'मध्ये ७४ तक्रारदारांचा सहभाग

सातारा : सातारा जिल्हा पोलिस दलाच्यावतीने गुरुवारी 'संवाद तक्रारदारांशी' या राबवलेल्या उपक्रमात ७४ तक्रारदारांनी सहभाग घेवून तक्रारी नोंदवल्या.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, जिल्ह्यातील सहा उपविभागीय कार्यालयात हा उपक्रम पार पडला. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसर्या गुरुवारी हा उपक्रम राबवला जात आहे. तक्रारदारांच्या ज्या तक्रारी आहेत त्या त्यांनी नजीकच्या पोलिस उपविभागीय कार्यालयात (डीवायएसपी) मांडव्यात. पोलिसांनी राबवलेल्या या उपक्रमामुळे तक्रारदारांचा वेळ व पैसा वाचत आहे.

चोराडे घरफोडीतील संशयित जेरबंद; मुद्देमाल हस्तगत

सातारा : चोराडे ता.खटाव येथे घरफोडी करुन सुमारे ६ लाख १० हजार रुपये किंमतीची साउंड सिस्टीम चोरी केल्याप्रकरणी शुभम रमेश मोहिते (वय ३०, रा. तोंडोली ता.कडेगाव जि.सांगली) याला सातारा पोलिसांनी अटक केली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी चोराडे ता.खटाव येथून पत्र्याच्या शेडमधून अज्ञाताने साउंड सिस्टीम, स्पीकर असे साहित्य चोरुन नेले. याप्रकरणी औंध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. स्थानिक पोलिस तसेच सातारा स्थानिक गुन्हे अन्वेषन विभाग या चोरीचा तपास करत असताना त्यांना तांत्रिक तपासामध्ये धागेदोरे मिळाले. त्यानुसार पोलिसांनी शुभम मोहिते याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली. चोरी केलेल्या साउंड सिस्टीमबाबत पोलिसांनी त्याला विचारले असता त्याने ती उसाच्या शेतात ठेवली असल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी साउंड सिस्टीम जप्त केली.

दरम्यान, साउंड सिस्टीम चोरी करण्यासाठी शुभम मोहिते याने दुचाकीचाही वापर केल्याचे समोर आले. यामुळे गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही सातारा एलसीबीने जप्त केली. पोलिस अधीक्षक समीर शेख, अपर पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अरुण देवकर, सपोनि सुधीर पाटील, फौजदार विश्वास शिंगाडे, पोलिस विजय कांबळे, मंगेश महाडीक, साबीर मुल्ला, अमोल माने, मुनीर मुल्ला, अमित झेंडे, स्वप्नील दौंड यांनी कारवाईत सहभाग घेतला.

### दुचाकीची चोरी

सातारा : सातारा शहरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातार्यातील विसावा नाका परिसरातील नवजीवन अपार्टमेंटच्या पार्किंगमधून अज्ञात चोरट्याने एमएच ११ डी ३७९६ या क्रमांकाची दुचाकी चोरून नेली. ही घटना दि. १२ जानेवारी रोजी घडली आहे. चैतन्य सुनील कुलकर्णी (रा.विसावा नाका, सातारा) यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### युवतीवर अत्याचार केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : युवतीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वेळोवेळी अत्याचार केल्याप्रकरणी रुपेश तानाजी चव्हाण (वय ३३, रा. कामथी, वेळे, ता. सातारा) याच्या विरुध्द सातारा तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, चव्हाण याने पीडित तरूणीला लग्नाचे आमिष दाखविले. त्यानंतर पीडितेवर त्याने अत्याचार केला. त्यातून पीडित तरूणी गर्भवली राहिली. त्याने युवतीला औषधी गोळ्या खायला दिल्यानंतर पीडितेचा गर्भपात झाला. काही दिवसानंतर त्याला पीडितेने लग्न कधी करणार असे, विचारले असता तो टाळाटाळ करू लागला. या प्रकारानंतर संबंधित तरूणीने सातारा तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# कुरूंदवाड येथील बनावट दरोड्याचा पर्दाफाश

**कुरुंदवाड** : कॅनॉलमध्ये गेलेल्या शेतजमिनीच्या मोबदल्यात मिळालेल्या लाखो रुपयातील बहिणीला वाटणी द्यावी लागू नये या उद्देशाने पती-पत्नीने घरात दरोडा पडल्याचा केला बनाव. दुपारी अचानक सात अनोळखी इसम घरी आले घरातील दोन महिलांना मारहाण केली आणि जबरदस्तीने घरातील अंदाजे सहा लाख रुपये रोख व १४ तोळे सोने घेऊन गेले अशी प्राथमिक वर्दी कुरुंदवाड पोलीस ठाण्यास मिळाली या माहितीने पोलिसांची धावपळ झाली परंतु चाणाक्ष सपोनि रविराज फडणीस यांच्या नजरेत हा बनावट प्रकार लक्षात आला कसून तपास केला असता सर्व रक्कम व दागिने सुरक्षित असल्याचे निष्पन्न झाले.

शिवनाकवाडी, ता. शिरोळ येथे गुरुवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास रत्नाबाई अशोक खोत आणि तिची सवत हिराबाई अशोक खोत या दोघी घरी असताना अचानक सात अनोळखी व्यक्ती घरी आले. त्या सर्वांनी या दोघींना जबर मारहाण केली अन जबरदस्तीने त्यांच्याकडून घरात असलेले सहा लाख रुपये रोख रक्कम आणि १४ तोळे सोने घेऊन पळून गेले.ही झालेली घटना रत्नाबाई खोत हिने पती अशोक खोत यास फोनवरून कळवले खोतने गावातील पोलीस पाटील श्री. खोत यास झालेला प्रकार सांगितला.त्यांनी कुरुंदवाड पोलीसात वर्दी दिली आणि पोलिसांची तपासाची चक्रे गतिमान झाली.

कुरुंदवाड पोलीस ठाण्याचे पोलीस पथक, गुन्हे अन्वेषण शाखा, ठसे तज्ञ,श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले दिवसाढवळ्या दुपारी अनोळखी सात व्यक्ती दरोडा टाकतात आणि लाखो रुपये व सोने घेऊन जातात ही घटना पोलिसांना आव्हानात्मक होती. या दृष्टीने सर्व पोलीस यंत्रणा गतिमान झाल्या. झालेल्या घटनेवर लक्ष केंद्रित केले.



शिवनाकवाडी येथे दरोड्याचा बनाव करण्यासाठी घरातील विस्कटलेले साहित्य.

पोलिसांच्या तपासातून उघड झाली ती खरी माहिती अशी अशोक खोत यासह चुलत तीन भाऊ यांची शेत जमीन कॅनॉलमध्ये गेली होती. त्या शेतजमिनीचे नुकसान भरपाई म्हणून अंदाजे दीड कोटी रुपये तिघा भावांना मिळाले होते. यातील काही रक्कम दाम दुपटीने बँकेत ठेवले आहे तर काही रकमेचे सोने आणि काही रक्कम घरात ठेवली होती.या सर्व रकमेतील बहिणीला वाटणी द्यावी लागू नये म्हणून पती-पत्नीने दरोड्याचा बनाव केला स्वतःच घरातील साहित्य विस्कटले रोख रक्कम व सोने घरातील माळ्यावर लपून ठेवले आणि पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी खोटी माहिती रचली.

कुरुंदवाड पोलीस ठाण्याचे सपोणी रविराज फडणीस यांच्या नजरेतून हा बनाव सुटू शकला नाही संबंधितांना पोलिसी खाक्या दाखविताच खरी माहिती बाहेर आली आणि पोलिसांनी सुटकेचा निश्वास सोडला या तपासाबाबत पोलिसांचे कौतुक होत आहे.

# मतदारांमध्ये उमेदवाराबाबत उत्सुकता

## मित्रपक्ष भाजपसाठी लोकसभा जागांचा त्याग करणार

## शिरूरची जागा भाजपा लढवणार



**पुणे** : काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या २०२४ सालच्या लोकसभा निवडणुकीत भाजपने आपकी बार चारशेचे लक्ष निर्धारित केले आहे . मागील लोकसभा निवडणुकीत भाजपने एकूण ४३७ जागा लढवल्या होत्या . त्यामध्ये भाजपला तीनशेहून अधिक जागांवर विजय मिळविता आला . याचाच अर्थ यावेळच्या निवडणुकीत भाजपा जास्तीत जास्त लोकसभेच्या जागा लढविणार आहे . दरम्यान राज्यात मित्रपक्ष भाजपसाठी जागांचा त्याग करणार का ? हा खरा प्रश्न असून जिल्ह्यातील महत्त्वाची शिरूर लोकसभेची जागा देखील भाजपा लढवू पाहत असून ही जागा भाजपा लढणार का याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे . भाजपने गेल्या काही महिन्यांपासून राज्यात इतर पक्ष लढवत असलेल्या लोकसभांच्या जागेवर लक्ष केंद्रित केले आहे . त्या अनुषंगाने जिल्ह्यातील शिरूर लोकसभा मतदार संघातील जागेवर देखील निवडणूक लढविण्यासाठी बैठका त्याचबरोबर कार्यकर्त्यांचे संघटन तसेच आढावा बैठका घेतल्याचे दिसून आले आहे . याचाच अर्थ असा होतो की २०२४ च्या निवडणुकीत भाजपा शिरूर लोकसभेची जागा लढू पाहत आहे . मात्र सध्यातरी भाजपने ही बाब गुलदस्त्यात ठेवली असून राज्यात महायुतीची सत्ता असल्याकारणाने शिरूर लोकसभेची जागा एकनाथ शिंदे गटाकडे जाते की अजित पवार गटाकडे जाते हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे . शिरूर लोकसभेसाठी महाविकास आघाडीचे डॉ.अमोल कोल्हे यांचे नाव जवळजवळ निश्चित झाले आहे .मात्र महायुतीकडून शिरूर लोकसभेसाठी कोणता उमेदवार असणार आहे हे मात्र अद्याप स्पष्ट झाले नाही .महायुतीच्या वतीने एकनाथ शिंदे गटाचे माजी खासदार तथा उपनेते शिवाजी आढळराव पाटील यांचे नाव चर्चेत आहे . परंतु भाजपने आपकी बार चार.सौ पारचा नारा दिल्याने शिरूर लोकसभेची जागा देखील भाजपा लढू शकतो असे भाकीत केले जात आहे .भाजपाने शिरूर लोकसभेची जागा लढवण्याचा निर्धार केला तर संभाव्य उमेदवार भोसरीचे विद्यमान आमदार महेश लांडगे हे उमेदवार असू शकतात . भाजपने २०१९ मध्ये राज्यात २५ जागा लढवल्या होत्या आणि २३ जागा जिंकण्यात यश मिळवले होते . एनडीएचा भाग असलेल्या शिवसेनेने २३ जागांवर उमेदवार उभे केले होते आणि १८ जागा जिंकल्या होत्या . शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर राज्यात भाजप आघाडीवर आहे .

त्यामुळेच भाजपा इतर पक्षांच्या बालेकिल्ल्यात उमेदवार निवडणुक रिंगणात उतरवु शकतो . सूत्रानुसार भाजपला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला थोड्याफार जागा द्याव्या लागणार आहे .असे असले तरी भाजपने राज्यात तीस ते पस्तीस जागा लढविण्याचा निश्चय केला आहे . ४८ जागांच्या महाराष्ट्रात भाजपने पस्तीस जागा लढविल्या तर उरलेल्या १३ जागा एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना आपसात वाटून घ्याव्या लागतील .

मात्र पुणे जिल्ह्याचा विचार केला तर जिल्ह्यातील महत्त्वाच्या असलेल्या सध्या महाविकास आघाडीच्या ताब्यात असलेली शिरूर लोकसभेची जागा आपल्या ताब्यात घेण्यासाठी भाजपा उत्सुक असून त्या दृष्टीने भाजपने पावले टाकण्यास आतापासूनच सुरुवात केली आहे . येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत जर का शिरूर लोकसभेची जागा भाजपने लढवली तर एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार गटाला हा मोठा राजकिय धक्का असू शकतो.

# डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुणे येथील 'सिल्व्हर रॉक्स' निवासस्थानी प्रभू श्रीराम कृपा पूजा, दर्शन व आरतीचे आयोजन

**पुणे** : अयोध्येत श्रीराम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा २२ जानेवारी रोजी संपन्न होत आहे. या कार्यक्रमास मंगळवारपासून सुरुवात झाली आहे. यानिमित्ताने उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुणे येथील 'सिल्व्हर रॉक्स' या निवासस्थानी प्रभू श्रीराम कृपा पूजा, दर्शन व आरतीचे आयोजन करण्यात आले.

यादरम्यान उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी पत्रकारांशी या अनुषंगाने संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या, येत्या २२ जानेवारी रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अयोध्या न्यास यांच्यावतीने अयोध्या येथे प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत आहे. हा एक केवळ मूर्ती ठेवण्याचा कार्यक्रम नसून शांततेच्या मार्गाने ज्यांना आराधना करायची आहे त्यांच्यासाठी हा आनंद सोहळा आहे. तसेच ज्यांची यावर श्रद्धा आहे, त्यांच्यावर बळजबरी करणाऱ्या प्रवृत्तींवर न्यायालयीन मार्गाने तोडगा काढून यश प्राप्त झाले आहे. हे भारतीय लोकशाहीचे यश असून यामुळे इतिहासाला कलाटणी देणारी घटना असल्याचे मत डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

या पार्श्वभूमीवर आज घरामध्ये प्रभू श्रीराम कृपा पूजेचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या इतिहासामध्ये २२ जानेवारी २०२४ हा दिवस सुवर्ण अक्षरात नोंदवला जाईल. कारण या दिवशी अनेक वर्षांनी रामलल्ला अयोध्येतील त्यांच्या भव्य राम मंदिरात विराजमान होणार आहेत. संपूर्ण जग या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

२३ जानेवारी रोजी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आहे यानिमित्ताने मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार राज्यभर विविध क्षेत्राशी संबंधित सकारात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत, असेही त्या म्हणाल्या.

संयुक्त राष्ट्र संघाच्यावतीने जगभरातील महिलांच्या परिस्थितीबाबत ११ ते २२ मार्च रोजी युनायटेड नेशन्स कमिशन ऑन द स्टेटस ऑफ वुमन ६८ (उडथ ६८) सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये जगभरातून दीड हजार सामाजिक संस्थांना मुद्दे मांडण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये स्त्री आधार केंद्राला देखील ही संधी मिळाली आहे.

त्यानुसार १६ मार्च रोजी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (EI) च्या काळामध्ये म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात लैंगिक समानतेला सायबर क्राईममुळे निर्माण झालेली आव्हाने' या विषयावर चर्चा होणार आहे.

यामध्ये नेदरलँड, इंग्लंड, जपान, नेपाळ यांसह पाच ते सहा देशांतील प्रतिनिधी सहभागी होणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.



### धार्मिक पर्यटनामुळे अर्थव्यवस्थेला गती

**राज्यात, देशात मोठ्या प्रमाणात तीर्थक्षेत्र ठिकाणी अनेक श्रद्धाळू येत असून त्यातून उद्योगधंद्यांना चालना देणारी केंद्रे ही ठिकाणे बनत चालले आहेत ही खूप महत्त्वाची बाब आहे. धार्मिक पर्यटनामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळत आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्रांच्या विकासाचे सर्वांनीच स्वागत केले पाहिजे असे त्यांनी सांगितले.**

### देशातील सर्व पीठासीन अधिकारी यांची कार्यशाळा

**२७ आणि २८ जानेवारी रोजी विधानभवनात देशातील सर्व विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापती यांची संयुक्तपणे परिषद मुंबई येथे होणार असून त्याबाबत लवकरच सविस्तर माहिती देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही कार्यशाळा ही २० वर्षांनंतर मुंबईत होत आहे. देशातील सर्व विधीमंडळांमध्ये समन्वय असावा हा या परिषदेचा हेतू आहे.**

### पुन्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ज्याप्रकारे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जनतेला वेळ देत आहेत, संकटात सापडलेल्याच्या मदतीला धावून जात आहेत, महिलांना न्याय देण्याबाबत महिलांना सन्मान, महिलांना अधिकार यासारख्या विविध लोक उपयोगी योजना ते राबवत आहेत त्यामुळे आगामी २०२४ मध्ये पुन्हा मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे विराजमान होतील असा विश्वास डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केला.**

# इंडियन आयडॉल'मध्ये हृतिक रोशनमुळे पियुष पंवारमध्ये कमालीचे परिवर्तन



**मुंबई:** या रविवारी, 'फाइट टू टॉप १०' थीम असलेल्या भागात खुद्द अभिनेता हृतिक रोशन हजर असणार आहे. या शोमध्ये हृतिकचे मनःपूर्वक स्वागत करताना परीक्षक विशाल दादलानी आणि स्पर्धकांनी एकत्र मिळून हृतिकच्या २५ जानेवारी रोजी प्रदर्शित होत असलेल्या 'फायटर' या आगामी चित्रपटातील 'सुजलाम् सुफलाम्' हे गाणे सादर केले. या भागात निवड झालेल्या टॉप १० स्पर्धकांवर प्रकाश झोत असेल आणि हे स्पर्धक 'इंडियन आयडॉल' चा किताब मिळवण्यासाठी यापुढील सुरेल वाटचाल चालू ठेवतील.

राजस्थानच्या पियुष पंवारने 'कहो ना प्यार है' चित्रपटाचे शीर्षक गीत आणि 'कभी खुशी कभी गम' चित्रपटातील 'यू आर सोणियो' ही गीते सादर करून सगळ्यांना प्रभावित केले. आपल्या अद्वितीय शैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या हृतिकने पियुष पंवारच्या मागील परफॉर्मन्सेसचे कौतुक करत पियुषचा लुक बदलून टाकण्याची आपली इच्छा व्यक्त केली. सगळ्यांची उत्कंठा वाढलेली असताना पियुष सगळ्यांसमोर आला आणि त्याच्यातील बदल पाहून सर्व जण थक्क होऊन गेले. आपल्याला मिळालेल्या प्रशंसेचा विनम्रतेने स्वीकार करून पियुषने त्याच्यातील लक्षणीय बदलाबद्दल हृतिकचे आभार मानले.

पियुषवर कौतुकाचा वर्षाव करत हृतिक म्हणाला, भारत आधीच त्या जुन्या पियुषचा चाहता बनला आहे. पण आता समस्त जग त्याच्या या नव्या रुपावर मोहित होण्यासाठी सज्ज आहे. विशाल दादलानी आणि श्रेया घोषालने देखील अशाच स्वरूपाच्या आपल्या भावना व्यक्त केल्या आणि पियुषच्या नवीन रुपाचे आणि अप्रतिम परफॉर्मन्सचे कौतुक केले.पियुषने हृतिकला 'कहो ना प्यार है' या प्रसिद्ध गाण्यावर आपल्यासोबत परफॉर्म करण्याचा आग्रह केला, तो या भागाचा मोठा हायलाइट होता. त्याच्या विनंतीला मान देऊन हृतिक इतर परीक्षकांसह मंचावर आला, त्याने पियुषची इच्छा पूर्ण केली व स्पर्धक तसेच प्रेक्षकांसाठी तो एक जादुई आणि अविस्मरणीय अनुभव देऊन गेला.

# आर्या आंबेकर, सुरेश वाडकरांच्या आवाजाने सजलेलं रामगीत पंतप्रधान मोदींनाही भावलं!

सध्या संपूर्ण भारतात अयोध्येच्या राम मंदिरात होर्णाया रामलल्लाच्या प्रतिष्ठापना सोहळ्याची आतुरता आहे. या पार्श्वभूमीवर देशभरात ठिकठिकाणी विविध कार्यक्रम साजरे होत आहेत, तसेच अनेक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. अनेक कलाकार मंडळीदेखील रामाच्या प्रतिकृती, रांगोळ्या साकारत हा जल्लोष साजरा करत आहेत. त्यातच आपल्या मराठी कलाकारांनीही रामावरील एक गीत सादर केलं. ज्याची दखल केवळ मराठी प्रेक्षकांनीच नाही तर देशभरासह चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही घेतली आहे.

संदीप खरे याने 'हृदय में श्रीराम'हे श्रीरामाला समर्पित गाणं लिहिलं आहे. त्याला सलील कुलकर्णींच्या संगीताची जोड मिळाली आहे. तर सुरेश वाडकर व आर्या आंबेकर यांनी या गीताला स्वरसाज चढवला आहे. या गाण्याला प्रेक्षकांची प्रचंड पसंती मिळत आहे. तर, दुसरीकडे खुद्द पंतप्रधानांनीही या गाण्याचे कौतुक केले आहे. यामुळे या गाण्याचे गायक व गीतकार भावूक झाले.

**पंतप्रधान मोदींनी ट्वीट करत केलं कौतुक**

पंतप्रधान मोदींनी ट्वीट करत लिहिलं आहे, ''अयोध्येत होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा संदर्भात संपूर्ण देश भगवान श्रीरामाच्या भक्तीच्या रंगात रंगला आहे. सुरेश वाडेकर आणि आर्या आंबेकर यांनी त्यांच्या मधुर सुरांमध्ये ही भावना व्यक्त केली आहे.'' सोबतच मोदींनी 'हृदय में श्रीराम' गाण्याची लिंकही शेअर केली आहे.

**आर्या आंबेकर भावूक होत म्हणालीष्ठ**

पंतप्रधान मोदींनी गाण्याची दखल घेतल्याबद्दल आर्या आंबेकर पोस्ट शेअर करत म्हणाली, ''जय श्रीराम. ज्यांच्या कार्याने मी प्रभावित होते असे माननीय पंतप्रधान मोदी यांच्या या पोस्टने माझ्या डोळ्यात पाणी आलं. असा पराकोटीचा आनंद कधीच अनुभवला नाही.. हा आनंद फक्त शब्दात मांडता येणार नाही!!! आमचा हा खारीचा वाटा, ही सांगीतिक सेवा श्रीराम चरणी रुजू झाली. प्रत्यक्ष श्रीरामाचा आशीर्वाद जणू पोचला, अशी आमची भावना निर्माण झाली.

प्रिय मोदीजी, २२ जानेवारीला मोठा दिवस साजरा करण्यासाठी आमच्या छोट्याशा योगदानाची दखल घेतल्याबद्दल मन:पूर्वक आभार. खरेच, यापेक्षा मोठे कोणतेही प्रोत्साहन असू शकत नाही.

तुमच्या पावलांवर पाऊल ठेवण्याचा, संगीताच्या माध्यमातून, माझ्या स्वत:च्या मार्गाने देशसेवा करण्याचा सदैव प्रयत्न करेन. मोदीजी, अत्यंत आदराने नतमस्तक होऊन तुमच्या चरणांना स्पर्श करून तुमचा आशिर्वाद घेते.''

**सलील कुलकर्णीही झाले भावूक**

या गाण्याचे संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी भावना व्यक्त करत म्हणाले, ''आपल्या गाण्याची माननीय पंतप्रधान नरेन्द्र मोदीजींनी दखल घेणं आणि कौतुक करणं ष्ठ..हा खूप खूप समाधानाचा क्षण. जय श्रीराम.''

**सुरेश वाडकर म्हणालेष्ठ**

याशिवाय हे गाणं गाणारे गायक सुरेश वाडकर म्हणाले, ''आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, मर्यादा पुरुषोत्तम प्रभूश्री राम यांना समर्पित आमचे भजन शेअर केल्याबद्दल तुमचे मन:पूर्वक आभार. तुमच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या श्री राम मंदिराच्या उद्घाटन आणि प्राण-प्रतिष्ठा महोत्सवासाठी संपूर्ण देश उत्सुक आहे. जो प्रत्येकाच्या जीवनातील एक दिव्य, अविस्मरणीय आणि अद्वितीय आणि पवित्र क्षण बनेल. जय जय श्री राम! सियावर रामचंद्र की जय !''



# कच्चा कांदा आरोग्यासाठी आहे बहुगुणी; 'हे' फायदे जाणून व्हाल हैराण



अनेकांना जेवण करताना तोंडी कच्चा कांदा खाण्याची सवय असते. तर काहींना कच्चा कांदा जेवणासोबत लागतोच. मात्र, कच्चा कांदा खावा की नाही असा अनेक जणांना पडलेला प्रश्न आहे. कांदा केवळ जेवणातच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. कांद्याचा रस आणि कच्चा कांद्याचे अनेक फायदे होतात. बहुतेक घरांमध्ये कांद्याचा वापर स्वयंपाकात केला जातो, एवढेच नाही तर लोक कच्च्या कांद्याची कोशिंबीरही जेवणासोबत खातात. सोडियम, फोलेट, पोटॅशियम, व्हिटॅमिन ए, सी, ई, कॅल्शियम, फॉस्फरस आणि मॅग्नेशियम यांसारखे अनेक पोषक घटक कांद्यामध्ये आढळतात. हे सर्व मिळून कांदा एक सुपरफूड बनतो.

**डोळ्याची दृष्टी सुधारते**

कच्च्या कांद्यामध्ये अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. त्यात व्हिटॅमिन सी, अँटीऑक्सिडंट्स आणि फ्लेव्होनॉइड्स सारखे पोषक तत्व मुबलक प्रमाणात आढळतात, जे शरीराला अनेक रोग आणि संक्रमणांपासून वाचवतात. कच्चा कांदा खाल्ल्याने दृष्टी सुधारते कारण त्यात व्हिटॅमिन ए, सी आणि ई आढळतात. कांदा डोळ्यांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. हे डोळ्यांची कमजोरी दूर करतात आणि त्यांना मजबूत ठेवण्यास मदत करतात.

**त्वचेसाठी फायदेशीर**

कच्चा कांदा मुरुम आणि त्वचेच्या समस्या दूर करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. यामुळे त्वचा स्वच्छ आणि मुलायम राहते. कच्च्या कांद्यामध्ये अँटीऑक्सिडंट आढळते ज्यामुळे त्वचा मुलायम आणि चमकते. मुरुम, डाग आणि सूज कमी करण्यासाठी हे उपयुक्त आहे.

**हृदयासाठी फायदेशीर**

फ्लेव्होनॉइड्स आणि थायोसल्फिनेट्स नावाची संयुगे कांद्यामध्ये मुबलक प्रमाणात आढळतात. हे दोन्ही हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत.फ्लेव्होनॉइड्स शरीरातील खराब कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करून हृदयासाठी फायदेशीर ठरतात. त्याचवेळी, रक्तवाहिन्या स्वच्छ ठेवण्यास मदत करतात. अशाप्रकारे, कांद्याचे सेवन केल्याने हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका कमी होतो. कांदा खाणे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे.

**रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करते**

कच्च्या कांद्यामध्ये क्रोमियम असते, हे खनिज रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी महत्त्वाचे असते. ज्यामुळे मधुमेहाचा धोका कमी होतो.

कच्च्या कांद्यामध्ये सल्फर अँटीऑक्सिडंट असतात जे कर्करोगापासून बचाव करण्यास मदत करतात. यामध्ये कर्करोगविरोधी गुणधर्म असतात जे शरीरातील कर्करोगाच्या पेशींच्या वाढीस अडथळा आणतात.

# अन्नपूर्णी वादावर नयनताराने सोडले मौन, पहिल्यांदाच व्यक्त केली भावना



अभिनेत्री नयनताराची भूमिका असलेला 'अन्नपूर्णी : द गॉडेस ऑफ फूड' हा चित्रपट १ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. त्यानंतर या चित्रपटाचं स्ट्रिमिंग नेटफ्लिक्स या ओटीटीवर सुरू झाले. चित्रपटातील भगवान रामाच्या मांसाहारा संदर्भात असलेल्या संवादामुळे नव्या वादाला जन्म दिला. नयनतारा आणि इतर कलाकारांवर या प्रकरणी तक्रारी दाखल झाल्या होत्या. तयार झालेल्या या वादाच्या पार्श्वभूमीवर ओटीटी प्लॅटफॉर्मने हा चित्रपट काढून टाकला होता.


नयनताराच्या 'अन्नपूर्णी' चित्रपटाची कथा शेफ बनू इच्छिणाऱ्या पूजाऱ्याच्या मुलीची गोष्ट आहे. परंपरेनं घरामध्ये मंदिरात देवासाठी प्रसाद बनवणाऱ्या पूजाऱ्याची अन्नपूर्णी ही मुलगी शेफ बनत असताना तिला मांसाहाराचेही सेवन करावं लागतं. शेफ बनण्यासाठी मांसाहाराची चव माहिती असायला हवी या गोष्टीची महत्त्व सांगताना एक पात्र तिला मांसाहारा सदर्भात काही गोष्टी सांगते. त्यातील एक संवाद काही लोकांना खटकला आणि वादाला सुरुवात झाली. यामुळे अनेक लोकांच्या धार्मिक श्रद्धा दुखावल्या गेल्या आणि चित्रपटाच्या निर्मात्यांविरुद्ध खटला दाखल करण्यात आला. नेटफ्लिक्सवरून चित्रपट काढून घेतल्यानंतर, नयनताराने झालेल्या प्रकाराबद्दल माफी मागत असल्याचा एक संदेश पोस्ट केला आहे.

नयनताराच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरील लांबलचक संदेशाचं कॅप्शन आहे : ''देवाचा आशीर्वाद असो'' (हात जोडलेल्या इमोजीसह). पुढील मजकूर तिने इंग्रजी, तमिळ आणि हिंदीमध्ये शेअर केला याची सुरुवात तिने 'जय श्री राम'ने केली.

नयनताराने शेअर केलेल्या संदेशाचे मराठी अनुवाद असा आहे. ''मी हा लेख जड अंत:करणाने आणि सत्यतेच्या आधारावर लिहित आहे. मागच्या काही काळात आमच्या अन्नपूर्णी चित्रपटासंदर्भात जे काही वातावरण निर्माण झालं आहे, त्यासंबंधी सर्व देशवासियांना मला निवेदन करायची इच्छा आहे. कोणत्याही चित्रपटाचा हेतू केवळ नफा मिळवणे असा असत नाही, तर एक संदेश देणेही असतो. हेच मी अन्नपूर्णीच्या बाबतीत म्हणेन की, याच्याशी संबंधीत भावना आणि मेहनत एका सच्चा विचाराने केली गेली आहे, ज्याचा उद्देश जीवन प्रवासाचे प्रतिबिंब दाखवणे आणि दृढ इच्छ शक्तीने अडचणींवर मात करणे आहे.

एक साकारात्मक संदेश देण्याच्या प्रामाणिक प्रयत्नात आमच्याकडून नकळतपणे आपल्या भावना दुखावल्या गेल्या. सेन्सॉरने संमत केलेला चित्रपट थिएटरमध्ये रिलीज झाल्यानंतर तो ओटीटीवरुन हटवला जाईल अशी आम्ही अपेक्षा बाळगली नव्हती. माझा आणि माझ्या टीमचा हेतू तुमच्या भावना आणि आस्था दुखावण्याचा नव्हता. असे कृत्य करणे हे माझ्या विचारांपासून कोसो मैल दूर आहे कारण मी स्वत: भगवानवर आस्था ठेवणारी आहे आणि देशातील तिर्थस्थळांना भेटी देणारी आहे. याविषयीचे गांभीर्य समजून घेऊन ज्या लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या त्या तमाम लोकांची मी माफी मागते.

# 'या' ठिकाणी सुरू झालं खास बटरफ्लाय पार्क!



अनेकांना फुलपाखरं इतकी आवडतात की ते देशाच्या विविध भागांतील बटरफ्लाय पार्कला भेट देतात. उद्यानात अनेक फुलपाखरे एकत्र दिसतात. तुम्हालाही फुलपाखरं पाहायला आवडत असेल तर मध्य प्रदेशमधील बटरफ्लाय पार्कला भेट देऊ. शकता. होय, आज आम्ही तुम्हाला मध्य प्रदेशमध्ये असलेल्या बटरफ्लाय पार्कबद्दल सांगणार आहोत.

मध्य प्रदेशातील कोणत्या शहरात बटरफ्लाय पार्क सुरु झालं आहे?

सर्वप्रथम, मध्य प्रदेशातील कोणत्या शहरात बटरफ्लाय पार्क सुरु झालं आहे ते जाणून घेऊया. अशा परिस्थितीत, तुमच्या माहितीसाठी आम्ही तुम्हाला सांगतो की, मध्य प्रदेशातील खंडवामध्ये एक बटरफ्लाय पार्क उघडण्यात आले आहे.

आम्ही तुम्हाला हेही सांगतो की खंडवा हे मध्य प्रदेशमध्ये प्रसिद्ध शहर असून एक लोकप्रिय पर्यटन स्थळ म्हणूनही ओळखले जाते. हे सुंदर शहर पाहण्यासाठी दररोज हजारो पर्यटक येतात.

**खांडवा बटरफ्लाय पार्क खूप खास आहे**

खंडवामधील बटरफ्लाय पार्क खूप खास आहे. वृत्तानुसार, हे उद्यान सुमारे १४ हेक्टरमध्ये तयार केले जात आहे. या उद्यानात फुलपाखरे पाहण्यासोबतच तिथे कारंजेही बांधण्यात येत आहे.

तुमच्या माहितीसाठी आम्ही तुम्हाला सांगतो की, खंडवा येथील इंदिरा सागर धरणाच्या तलावाच्या काठावर नैसर्गिक सौंदर्यात हे सुंदर उद्यान तयार केले जात आहे. बटरफ्लाय पार्कमध्ये पर्यटकांना बसण्याची आणि विश्रांती घेण्याचीही सोय होणार आहे.

खंडवा बटरफ्लाय पार्कमध्ये एक-दोन नव्हे तर दीडशेहून अधिक प्रजातींची फुलपाखरं जवळून पाहता येतात. या उद्यानात फुलपाखरांसाठी विशेष प्रकारची फुले व रोपेही लावण्यात येणार आहेत.

बातमीनुसार, कॉमन कॅस्टर, लाईन ब्लू, बाल्का पोपट, स्पॉटेड पोपट, कॉमन जे, प्लेन टायगर, कॉमन ग्लास यलो, डिंगी स्विफ्ट इत्यादी फुलपाखरांच्या अनेक प्रजाती या उद्यानात पाहायला मिळतात.

**खांडवा बटरफ्लाय पार्कला भेट देण्याची वेळ आणि तिकिट**

वृत्तानुसार, उद्यान अद्याप पर्यटकांसाठी पूर्णपणे खुले करण्यात आलेले नाही, कारण उद्यानाचे बांधकाम अद्याप सुरू आहे. मात्र, सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत या उद्यानाला भेट देता येईल, असा अनेकांचा विश्वास आहे. उद्यानाचे तिकीट किती आहे याची माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही.

# 'आजवरच्या आयुष्यात कधीही कुणाचा सल्ला घेतला नाही'! मनिषा असं का म्हणतेय?



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री मनिषा कोईरालाविषयी जेवढं बोलावं तेवढं कमी आहे. ती गेल्या तीन दशकांहून अधिक काळ बॉलीवूडमध्ये सक्रिय असणारी सेलिब्रेटी आहे. काही वर्षांपूर्वी तिला कॅन्सर सारखा दुर्धर आजार जडला होता. त्यातून आता ती बरी झाली आहे.

मनिषानं टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काही गोष्टी नव्यानं शेयर केल्या आहेत. मनिषआनं तिचं आयुष्य हे तिच्या नियम अन् अटींवर जगल्याचे यापूर्वीच्या मुलाखतींमध्ये सांगितले आहे. नव्या मुलाखतीमध्ये तिनं आयुष्याच्या खडतर प्रवासामध्ये आपल्याला काय उपयोगी पडलं याविषयी सांगितलं आहे.

गेल्या काही प्रोजेक्टमधून मनिषानं काही नवोदित कलाकारांसोबत काम केले. त्यांच्याविषयीच्या अनेक गोष्टी मनिषानं यावेळी सांगितल्या आहेत. ती म्हणते, मी सांगू आताची ८० टक्के नवीन तरुण कलाकार हे त्यांच्या कामाप्रती खूपच गंभीर असल्याचे दिसते. त्यांना काय करायचे आहे हे माहिती आहे. त्यांच्याकडे खूप सारी माहिती देखील आहे. त्यामुळे ते खूपच ॲडव्हान्स आहेत.

त्या नव्या तरुण पिढीचं मला खूपच कौतुक आहे. मी त्यांच्या कमिटमेंटची फॅन झाली आहे. तुम्ही त्यांच्या उरलेल्या २० टक्क्यांकडे फारशा नकारात्मकतेनं पाहू नका. ते त्यावर मात करतील अशी आशा मला आहे. ते जुन्या लोकांकडून मार्गदर्शन घ्यायला मागे पुढे पाहत नाहीत. त्यामुळे मला त्यांच्याविषयी आदर आहे आणि नवलही...अशा शब्दांत मनिषानं तिच्या भावना व्यक्त केल्याचे दिसून आले.

हे पाहा प्रत्येकाची जर्नी वेगळी आहे. त्यातील थांबे वेगळे आहेत. त्यामुळे तुम्ही कुणाला त्यावरुन पारखू शकत नाही. माझाही प्रवास खूपच वेगळा आहे. मात्र त्यात एक गोष्ट आहे ती म्हणजे मी कधीही कुणाकडून कसं जगावं यासाठी सल्ला घेतलेला नाही. कुणाचा उपदेश घेण्यापासून लांब राहिले. आता ही ज्याची त्याची कारणं आहेत असे मला वाटते. असंही मनिषानं यावेळी सांगितले.